Library

किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY ★ LIBRARY ★ ३०/१०/०७

## उत्सव सुगीचा

३ ● फराळ
५ ● अल्हादयंति भूतानि....
११ ● पूर्वरंगात रंगलेला चंद्रोत्सव
१९ ● दुष्काळाची उडविली हुर्यो
२५ ● पश्चिमेकडील 'थँक्स गिव्हिंग'
३५ ● यातुविद्या आणि जमिनीचे सुफलन

* समृद्धी विशेषांक *

* दीपावलीच्या शुभेच्छा *

खंड ६ : अंक ८ नोव्हेंबर २००७

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**

**वर्गणीसाठी पत्ता :**

**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com

**अर्थबोधपत्रिका**
**खंड ६ (अंक ८) नोव्हेंबर २००७**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

## *'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?*

- ◆उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- ◆अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- ◆नि:पक्ष व साधार
- ◆सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- ◆हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

## *'अर्थबोधपत्रिके'चा हेतू*

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

## *'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?*

- ◆मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- ◆निवडक साहित्याचे संकलन
- ◆संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- ◆संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

> जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती-तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# फराळ

लक्ष लक्ष दीपज्योतींच्या स्निग्ध आणि चैतन्यदायी प्रकाशाने तनमनाला उजळून टाकणाऱ्या दीपावलीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा ! दिवाळीच्या औरसचौरस फराळाचा मनमुराद आनंद लुटत असतानाच 'अर्थबोधपत्रिके'चा हा वाचन वानवळा सादर करून त्या आनंदात भर घालण्याचा हा नम्र प्रयत्न. आमच्या विचारविश्वात शरीराला 'स्थूल' आणि 'सूक्ष्म' अशी दोन परिमाणे आहेत. पंच ज्ञानेंद्रिये आणि पंच कर्मेंद्रिये यांच्या संयोगाने तयार झालेल्या स्थूल शरीराच्या आश्रयाने सूक्ष्म शरीर आपले व्यवहार करीत असते. मन आणि बुद्धी या दोन तत्वांचे मिळून हे सूक्ष्म शरीर तयार होते, असे आमची परंपरा सांगते. शरीराच्या रक्षण-भरणपोषणासाठी अन्नाची निकड असते. लाडू-चकल्या-कडबोळी-चिवडा-शंकरपाळे-चिरोटे-करंज्या-अननसाच्या फराळाने स्थूल शरीराचे कोडकौतुक करीत असतानाच विचारांचे खाद्य पुरवून मन-बुद्धीरूपी सूक्ष्म शरीराचे संवर्धनही घडावयास हवेच. स्थूल आणि सूक्ष्म अशा दोन्ही शरीरांना संतुलित फराळ मिळेल ती खरी दिवाळी.... अक्षय आनंदाची. दिवाळीचा अनुबंध हा प्रकाशाशी आहे. 'प्रकाश' हे समृद्धीचे, संपन्नतेचे प्रतीक. ही समृद्धी जशी भौतिक तशीच आंतरिकही. भौतिक विश्वातील प्रकाश पाझरतो दिवाळीच्या अगणित पणत्यांमधून, तर, आंतरिक प्रकाश स्त्रवतो तो अंतःकरणात अखंड तेवणाऱ्या विवेकरूपी दीपाद्वारे. सदसद्विवेकाच्या या दीपज्योतीवर अविचाराची काजळी धरली जाऊ नये, यासाठी अष्टौप्रहर जागृत असणे म्हणजेच 'नॉलेज सोसायटी'चे पांथस्त बनणे. अविवेकाची अशी काजळी त्या ज्योतीवर धरली गेलीच नाही तर अंतरीचा ज्ञानदीप सदोदित तेजाळलेलाच राहील. अक्षय प्रकाश... अक्षय दिवाळी...अक्षय आनंद ! अशी दिवाळी घरीदारी निरंतर साजरी व्हावी, याचसाठी कास धरावयाची ती विवेकाच्या संगोपनाची. आज सर्वत्र गवगवा आहे तो ज्ञानाधिष्ठित समाजाचा. माहितीच्या अप्रतिहत उपलब्धतेमुळे, दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर स्फोटामुळे, आम्ही अलीकडे परिभाषा वापरतो ती 'नॉलेज सोसायटी'ची. परंतु, ज्याप्रमाणे केवळ 'माहिती' म्हणजेच 'ज्ञान' नव्हे, त्याचप्रमाणे निव्वळ ज्ञान म्हणजेच विवेकही नव्हे.

अफाट बुद्धिमत्तेचे लेणे लाभलेली व्यक्ती विवेकी असतेच वा असेलच याची शाश्वती नसते. कारण इथे प्रश्न असतो तो उपयोजनाचा. व्यक्तिगत वा सामाजिक स्तरावर आम्हांला भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी हाताशी असलेल्या 'माहिती'चे रूपांतर उपयोजित 'ज्ञाना'मध्ये कसे करावयाचे याचेही ज्ञान हवेच ! अर्जित ज्ञानाचे उपयोजन कसे करावयाचे यासाठी निकड भासते ती सारासारविवेकाची. आजचे युग हे माहितीचे युग आहे. इथून पुढे आपल्याला प्रवेश करावयाचा आहे तो ज्ञानाच्या युगात -म्हणजेच ज्ञानाधिष्ठित समाजात. परंतु, हा प्रवास केवळ तिथेच आटोपून चालणार नाही. ज्ञानाधिष्ठित समाजालाही अधिष्ठान असावे लागते ते विवेकाचेच. विवेकाचे अस्तर लाभलेला समाज हा त्याहीपुढचा टप्पा आहे. आपल्या मनीमानसी आस हवी ती विवेकाधिष्ठित समाजव्यवस्थेच्या निर्मितीची. विवेकाचे अस्तर लाभलेल्या समाजव्यवस्थेतच निरंतर दिवाळीचा आनंद वा दिवाळीचा निरंतर आनंद शक्यतेच्या आवाक्यात येतो. अशा दिवाळीचा फराळही आगळावेगळाच असावा, हे ओघानेच येते. त्या फराळाची भाजणी तयार करण्यासाठी आम्ही पदर कधी खोचणार आहोत ? आपली परंपरा, आपल्यापर्यंत आलेला आजवरच्या संचित ज्ञानाचा ठेवा, भवतालचे वास्तव या अवघ्याचा निर्लेप, अभिनिवेशरहित मनाने ठाव घेण्यासाठी सिद्ध होणे, ही त्या भाजणीची पूर्वतयारी ठरते. कशाचाही आंधळा स्वीकार अथवा धिःक्कार न करणे, याचेच नाव सारासारविवेक. सूक्ष्म शरीराच्य भरणपोषणासाठी त्याच्यापुढे ताट सरकवावयाचे ते विवेकाच्या फराळाचे. कारण, स्थूल काय वा सूक्ष्म काय, शरीराच्या धारणेसाठी अत्यावश्यक असते ते अन्नच. खास दिवाळीसाठी खपून तयार केलेल्या खाद्य जिनसांना आम्ही लाडाकोडाने 'फराळ' असे संबोधतो, इतकेच काय ते. एरवी ते अन्नच ! दीपावलीसाठी सिद्ध केलेल्या या वाचनरूपी फराळात, म्हणूनच, रांधून सर्वत्र वाढला आहे अन्नमहिमा. दसरा-दिवाळीचा जैविक संबंध आहे कृषिसंस्कृतीशी, समृद्धीशी आणि या दोहोंच्या हातात हात गुंफून येणाऱ्या अन्नधान्याच्या मुबलकतेशी. या मुबलकतेच्या आणि तिच्याप्रीत्यर्थ देशोदेशी साजऱ्या केल्या जाणाऱ्या सणासुदींच्या तपशीलरूपी जिनसांनी 'पत्रिके'च्या फराळाचे ताट सजवले आहे. ✿✿

# अन्नाद्भवंति भूतानि.....

काही गोष्टी मोठ्या मजेदारच असतात. काही केल्या त्यांचा उलगडा होत नाही तो नाहीच. आता हेच पाहा ना, पाण्याला आम्ही 'जीवन' असे संबोधतो. पाण्याशिवाय आमचे जीवन व्यर्थ आहे, किंबहुना, पाण्याशिवाय जीवमात्र जगूवाचू शकणारच नाही, हा भाव त्यातून व्यक्त होतो. परंतु, 'माणसाच्या मूलभूत गरजा कोणत्या ?' असा प्रश्न कोणी विचारला तर मात्र आपण उत्तर देतो की, 'अन्न-वस्त्र-निवारा या मनुष्यप्राण्याच्या तीन मूलभूत गरजा आहेत' म्हणून. आता सांगा, या तीन मूलभूत गरजांमध्ये पाण्याचा समावेश का नाही ? आता, पाण्याशिवाय माणूस काय कोणताच प्राणिमात्र जर जगूच शकणार नसेल तर मग मनुष्यप्राण्याच्या मूलभूत गरजांमध्ये पाण्याचा, पर्यायाने 'जीवना'चा अंतर्भाव का नाही ? एखादा चतुर मनुष्य यावर मखलाशी करून उत्तर देईल की, 'अन्नपाण्याशिवाय माणूस जगू शकणार नाही, असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा अन्नाच्या जोडीनेच मनुष्याच्या मूलभूत गरजांमध्ये पाण्याचा अंतर्भाव आहेच की'. हा मुद्दा तसा बरोबर आहे. पण ठरवलेच तर त्यावरही कुरघोडी करता येईल की, 'अन्नपाणी' या जोड संकल्पनेमध्ये अन्नाच्या बरोबरीनेच पाण्याचाही मनुष्याच्या मूलभूत गरजांमध्ये अंतर्भाव होत असला तरी इथे पाण्याच्या आधी अन्नाचा निर्देश केला जात असल्याने, 'अन्न' आणि 'पाणी' यांच्या प्राधान्यक्रमातही अन्नाचाच नंबर पहिला लागतो !

हा सारा शब्दच्छल घटकाभर बाजूला ठेवू. गंमत म्हणून एक वेळ सोडून देऊ. परंतु, त्यामुळे एक ऐतिहासिक, प्राचीन सत्य मात्र डोळ्याआड करता येणार नाही. अन्न हाच अवघ्या जीवसृष्टीचा आद्य आधार आहे, ही मनुष्यमात्राची धारणा पार वेदकालापासून आमच्या विचारविश्वात दृढमूल बनली आहे, हे ते सत्य. अन्नांविषयी वेदांत वारंवार प्रार्थना केलेली आढळते. ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलात 'अन्नस्तुती' नावाचे एक सूक्तच आहे. अन्न म्हणजेच प्राण होय, अशी वेदकालीन मानवाची कल्पना होती. भौतिक सुबत्ता-समृद्धीची सारी मानकेही अन्नाच्या उपलब्धी-मुबलकतेशीच जोडली जावीत, हे मग स्वाभाविकच ठरते. ज्याच्याजवळ अन्नाचा भरपूर साठा आहे असाच मनुष्य लोकांमध्ये पुष्कळ महत्त्व पावतो, ही त्या काळची धारणा त्या अन्नमाहात्म्याशी सुसंगतच ठरते. भारतीय आध्यात्मिक ज्ञानसंभाराचा जणू मेरूमणीच

शोभणाऱ्या गीतेतही समस्त जीवांचे अस्तित्व आणि त्या अस्तित्वाचे अधिष्ठान असणारे अन्न यांचा अन्योन्य संबंध विलक्षण उत्कट शब्दांत गायलेला आहे. 'अन्नापासून भूते (जीवमात्र) उत्पन्न होतात. पर्जन्यापासून अन्नाची उत्पत्ती आहे. यज्ञापासून पर्जन्य होतो आणि कर्मापासून यज्ञाची उत्पत्ती आहे', असा कार्यकारणभाव सांगणारा एक श्लोकच (श्लोक क्रमांक १४) गीतेच्या तिसऱ्या अध्यायात आहे.

पुरेसे अन्न नसेल तर जीवमात्र जगणारच नाहीत. वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पाऊसच पडला नाही तर पुरेसे अन्न पिकणार नाही. गरजेनुसार पाऊस पडावयास हवा असेल तर यज्ञ केलाच पाहिजे कारण यज्ञामुळेच पाऊस पडतो, हा या श्लोकाचा इत्यर्थ. मानवसमूहाची वेदकालापासून चालत आलेली धारणाच या श्लोकाच्या रूपाने गीतेमध्ये प्रतिबिंबित झालेली दिसते. ज्या काळात 'विज्ञान' ही संकल्पना मानवजातीच्या कल्पनेच्या परिघातदेखील प्रवेशलेली नव्हती, त्या काळातील या सगळ्या कल्पना-धारणा आहेत, हे या ठिकाणी विसरता कामा नये. आज कालचक्राने फेऱ्यावर फेरे पुरे केलेले असले तरी, 'यज्ञ' या संकल्पनेचे भारतीय विचार तसेच भावविश्वाला एवढे आकर्षण का आहे, या प्रश्नाचे उत्तर इथे दडलेले सापडते. उभे मानवी अस्तित्वच मुळी अन्नावर अवलंबून असल्याने आणि त्या अन्नाची उपलब्धता अप्रत्यक्षपणे यज्ञावर निर्भर असल्याने एका विशाल भूभागावर यज्ञप्रधान संस्कृती प्रदीर्घ काळ का नांदली असावी, याचा अंदाज यावरून येतो. विज्ञानाच्या अपूर्व प्रगतीमुळे पाऊस नेमका कशामुळे पडतो, याचे रहस्य त्याला उलगडलेले असले तरी पाहिजे तेवढा पाऊस पाहिजे तेव्हा दरवर्षी पडेलच याची शाश्वती देणारी कळ काही त्याला आजही गवसलेली नाही. त्यामुळे, पावसावरच अवलंबून असलेल्या शेतीद्वारे पिकणाऱ्या अन्नाच्या उपलब्धतेबाबतची निश्चिंतता पृथ्वीच्या पाठीवरील अनेक देशांमधील कोट्यवधी नागरिकांना आजतागायत लाभलेली नाही. 'फूड सिक्युरिटी' हा आजच्या २१ व्या शतकातही कळीचा मुद्दा का बनतो, त्याचे मर्म यावरून ध्यानात यावे.

अन्नधान्याबाबतची शाश्वती वा अशा शाश्वतीचा अभाव, हा प्राचीन काळापासून मानवाच्या जिव्हाळ्याचा विषय राहिलेला आहे. अन्नधान्यविषयक क्रियाकलापातून सर्व जगभरच नानाविध धार्मिक उत्सव तसेच सणांची निर्मिती झालेली आढळते. 'अन्नकूट', 'अन्नदान', 'अन्नछत्र' यांसारख्या धार्मिक-सांस्कृतिक उपक्रमांचे मानवी मनाला वाटणारे महत्त्व आणि आकर्षण त्याचप्रमाणे, भारतीय दैवतमंडलातील कुबेर, वरूण, इंद्र, सूर्य यांसारख्या देवदेवतांच्या उपासनापद्धतींच्या प्रदीर्घ परंपरा अग्रपूजेचा

# अन्नमय प्राण, प्राणमय पराक्रम....

अन्न हाच मानवी अस्तित्वाचा मूलाधार असल्याने मानवी जीवनसंस्कृतीच्या आविष्काराचे एक प्रमुख माध्यम गणल्या गेलेल्या भाषेतही अन्नमाहात्म्याचे प्रतिबिंब डोकवावे, हे स्वाभाविकच ठरते. 'अन्न' या मध्यवर्ती संकल्पनेभोवती गुंफले गेलेले अनेकानेक वाक्प्रचार म्हणूनच अभ्यसनीय ठरतात. मानवी जीवन अन्नाशी किती अंगांनी अभिन्नपणे जोडले गेलेले आहे, याची केवळ झलक दाखविणारे मराठी भाषेतील हे काही अन्नविषयक वाक्प्रचार वानगीदाखल-

(१) **अन्नाचे खोबरें होणे :** अन्न खोबऱ्याप्रमाणे दुर्मिळ होणे; अन्नाची वाण भासणे; दुष्काळ पडणे.

(२) **अन्नाआड येणें :** एखाद्याच्या तोंडचा घास काढणे; एखाद्याचे उपजीविकेचे साधन नाहीसे करणे; एखाद्याच्या उपजीविकेच्या मार्गात अडथळा आणणे.

(३) **अन्न कडेकाठास ठेवणे :** जेवावयास बसल्यावर जरूर लागल्यास घेता यावे म्हणून काही पदार्थ जवळ घेऊन ठेवणे.

(४) **अन्नाचा किडा :** खादाड, अधाशी. काही उद्योग वगैरे न करता अन्नाकरता केवळ दुसऱ्यावर अवलंबून असणारा.

(५) **अन्नाची क्रिया :** अन्नाची शपथ, आण, भाक. एखाद्याचे अन्न खाल्ल्यामुळे झालेले उपकार व त्याबद्दल उतराई होण्याचे कर्तव्य.

(६) **अन्नाची लाज धरणे :** एखाद्याने आपले पोषण केले असेल तर, आपणास आश्रय दिला असेल तर त्याबद्दल त्याचे ऋणी असणे किंवा उतराई होणे.

(७) **अन्नाचे पाणी करणे :** अन्नाची चव बिघडवून टाकणे; अन्न बेचव, निःसत्त्व करणे. काहीतरी अनिष्ट करून जेवणावरचे मन उडवून लावणे; अन्नास गोडी लागणार नाही अशी मनःस्थिती उत्पन्न करणे.

(८) **अन्नाच्या पाठीस लागणे :** पोटास मिळविण्याकरिता परिश्रम करणे; उदरनिर्वाहाकरिता दूरवर जाणे, प्रवास करणे.

(९) **अन्नात माती कालवणे :** एखाद्याच्या निर्वाहाच्या साधनाचा नाश करणे; एखाद्याच्या उपजीविकेच्या आड येणे.

**(१०) अन्नात माशी पडणे** : अन्नात माशी पडली तर अन्न ओकून पडते. यावरून एखादी गोष्ट अगदी सिद्ध होण्याच्या बेतात आली असता मध्यंतरी विघ्न येणे; फलप्राप्तीच्या वेळी कार्यांत बिघाड निर्माण होणे.

**(११) अन्नानुसार बुद्धी** : ज्याचे अन्न खावे त्याच्यासारखे वागावे असे वाटू लागते; विशेषतः दुष्ट मनुष्याचा आश्रय केल्यास आपलीही बुद्धी त्यासारखी होण्याचा संभव असतो.

**(१२) अन्नावर वाढणे** : एखाद्याच्या आश्रयाने पुढे येणे; एखाद्याकडून भरणपोषण होणे.

**(१३) अन्नास लावणे** : एखाद्यास निर्वाहाचे साधन मिळवून देणे; एखाद्यास काही काम, उद्योगधंदा, उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देणे.

**(१४) अन्नोदक ऋणानुबंध** : एखाद्याचे अन्न वगैरे खाल्ल्याने त्याबद्दलची आपल्या मनात उत्पन्न झालेली भावना.

**(१५) अन्न कमी बहु मुले, सुख देऊन दुःख आणिले** : घरात पुरेसे खावयास नसता जर फार मुले झाली तर सुखाचा जीव दुःखात टाकल्यासारखा होतो.

**(१६) अन्न घातले तर मानेचा काटा मोडतो व डांग घातली तर उभा राहतो** : ज्या मनुष्यास आपण खाऊ घालतो तो उपकाराने दबला जातो पण ज्यास आपण अपकार करतो (काठीने मारतो) तो आपला द्वेष करू लागून प्रतिकार करण्यास सज्ज होतो. तेव्हा शिक्षेपेक्षा उपकाराने शत्रूस नरम आणणे अधिक श्रेयस्कर.

**(१७) अन्नाने देह जगतो पण मन जिवंत ठेवण्यास विचाराचा खुराक हवा** : अन्न हे केवळ शरीराचे पोषण करते पण मनाचा विकास व्हावयाचा असल्यास त्यास चांगल्या विचारांचे, वाचन, चर्चा, श्रवण वगैरेच्या साहाय्याने खाद्य पुरविले पाहिजे, नाही तर ते खुरटून जाते.

**(१८) अन्न पाठीवर ठेवणे त्यापेक्षा बरवे खाणे** : पोटात भूक असता अन्न नुसते पाठीवर ओझ्याप्रमाणे बांधून ठेवणे त्यापेक्षा खाऊन टाकणे बरे. एखाद्या गोष्टीचा उपयोग होणे शक्य व जरूर असता तिचा उपयोग न करता केवळ जपून ठेवणे हा मूर्खपणा आहे. ✿✿

आपला मान भारतीय संस्कृतीच्या प्रांगणात प्राचीन काळापासून आजवर का टिकवून आहेत, याबाबतचे कुतूहल शमण्यासाठी मानवी उत्क्रांतीचा भव्य पट न्याहाळावा लागतो. जीवसृष्टीच्या अस्तित्व -सातत्यासाठी असणारी अन्नाची गरज, हे या सगळ्यातील सारतत्व आहे. जीवधारणेसाठी अन्नाची आवश्यकता असल्याने भारतीय आध्यात्मिक तसेच पारमार्थिक क्षेत्रात सर्वोत्तुंग गणल्या गेलेल्या 'ब्रह्म' या संकल्पनेचे लक्षणही काही ठिकाणी अन्नाला बहाल केले गेल्याचे आढळते (अन्न हे पूर्णब्रह्म).

पशुपालनासारख्या भ्रमंतीयुक्त जीवनप्रणालीतून उत्क्रांत होऊन शेतीप्रधान स्थिर जीवनप्रणालीशी परिचित होणे, हा एकंदरच मानवी उत्क्रांतीमधील एक अतिशय मोठा, महत्वाचा आणि मूलभूत स्थित्यंतराचा टप्पा होता. या स्थित्यंतराचे पडसाद मानवाच्या दैवतविषयक, अन्नविषयक, अन्नोत्पादनविषयक अशा नानाविध बाबींमध्ये पडले असले पाहिजेत. पुन्हा, हे स्थित्यंतरही पृथ्वीच्या पाठीवरील विविध मानवी समूहांत एकाच वेळी एकाच प्रकारे घडून आले, असेही नाही. आदिम अवस्थेत जगणारे मानवी समूह, शिकार, कंदमुळे संकलन करून उपजीविका करणारे मानव समूह, पशुपालनाच्या टप्प्यापर्यंत उत्क्रांत झालेले समाज आणि हळूहळू शेतीचे तंत्र आत्मसात केलेले, तुलनेने प्रगत, स्थिर जीवन व्यतीत करणारे गटसमूह एकाच वेळी आपापल्या पद्धतीने जगत आहेत, अशी संमिश्र स्थितीही बराच काळ राहिली असावी असे मानण्यास भरपूर जागा आहे. या मानवी समूहांच्या अन्नप्राप्तीशी संलग्न धारणाही वेगवेगळ्या असाव्यात, असे मानण्यासही जागा आहे. याचे त्या मानाने अगदी अलीकडचे उदाहरण म्हणजे आपल्या संस्कृतीतील अन्नकूटाच्या पूजेचे.

## अन्नकूट आणि संस्कृतिसंक्रमण

गोकुळातील इंद्रपूजनाच्या प्रथेची पार्श्वभूमी या कथेस आहे. नंदादी गोपांनी इंद्राच्या पूजनाची चालविलेली तयारी मोडून काढून कृष्ण त्यांना गोवर्धनाची पूजा अंगिकारण्यास भाग पाडतो, हा या कथेचा गाभा. इंद्र ही पर्जन्यकारक देवता मानली जाते. अतिवृष्टी वा अवृष्टी यांचे संकट टाळण्यासाठी इंद्राची पूजा करावयाची, हा तत्कालीन प्रघात. कारण अतिवृष्टी वा अवृष्टीचा थेट संबंध अन्नाच्या उपलब्धतेशी. मात्र, पाऊस पडण्या - न पडण्याशी इंद्राचा काहीएक संबंध नाही, आपल्या गुरा-वासरांचा पोशिंदा हा गोवर्धन पर्वत आहे, तेव्हा आपल्यासारख्या गोपालकांनी पूजा करावयाची ती या गोवर्धनाचीच, असे ऐलान कृष्णाने केले आणि इंद्र रागावला. पुढील कथाभाग आपण इथे विचारात घ्यावयास नको. इथे ध्यानात हे घ्यावयाचे की,

पशुपालनप्रधान आणि शेतीप्रधान जीवनप्रणालींच्या संधिकाळातील संस्कृतिसंवाद-विसंवादाचा हा एक नमुना आहे. त्या गोवर्धनपूजेचा आज आपल्यापर्यंत टिकलेला अवशेष म्हणजे प्रतिवर्षीच्या कार्तिक शुद्ध प्रतिपदेस केली जाणारी अन्नकूटाची पूजा.

कृष्णाच्या मूर्तीपुढे उभारला जाणारा अन्नपदार्थांचा मेरू म्हणजे अन्नकूट. गोकुळातील गोवर्धनाच्या पूजेची ही प्रतिकात्मक स्मृती. इथे कृष्णाच्या प्रतिमेपुढे उभारली जाणारी मिष्टान्न-खाद्यान्नांची रास हे प्रतीक आहे सुबत्तेचे, अन्नधान्याच्या समृद्धीचे, मुबलकतेचे. तत्कालीन वाद होता तो केवळ या सुबत्तेच्या स्त्रोताबद्दल. पशुपालनप्रधान संस्कृतीच्या अनुयायांच्या प्रतिपादनानुसार गोवर्धन पर्वत हा त्यांची उपजीविका ज्यावर अवलंबून होती त्या गाईवासरांच्या भरणपोषणाचा स्त्रोत होता. त्यामुळे कृतज्ञतेच्या भावनेतून पूजा करावयाची तर ती गोवर्धनाचीच करावी, हा त्यांचा आग्रह. कारण त्यांची 'फूड सिक्युरिटी' अंततः गोवर्धनावरच अवलंबून होती. तर, पशुपालनाच्या अवस्थेतून उत्क्रांत होऊन शेतीच्या प्रगत अवस्थेत स्थिरावलेल्या समूहांच्या लेखी शेतीची भरभराट ज्या पावसावर अवलंबून त्या पावसाचे गणित ज्याच्या मुठीत त्या इंद्राची मर्जी राखणे अगत्याचे. कारण, त्यांच्या कणगीची खळगी भरणे न भरणे हे इंद्रावर विसंबलेले. मनाजोगता पाऊस होऊन पीकपाणी उदंड पिकले की निदान वर्षाची तरी ददात मिटली या भावनेतून उत्सव साजरा करावयाचा आणि त्याच वेळी अन्नाची ही शाश्वती प्रदान करणाऱ्या देवतेप्रतीची पूज्यभावना व्यक्त करण्यासाठी धार्मिक विधी-व्रते-कर्मकांडेही आचरावयाची या दुहेरी मानसिकतेचे प्रतिबिंब आमच्या आजच्या विविध सणावारांना जडलेल्या सांस्कृतिक आणि धार्मिक परिमाणांमध्ये सामावलेले आढळते.

आमची दिवाळीही यास अपवाद नाही. दीपावलीचे सारे वेळापत्रकच या वास्तवाची साक्ष देते. पावसाळा संपून नवी पिके हाती आल्यानंतर साजरा होणारा हा आमचा सर्वांत मोठा आणि महत्त्वाचा प्राचीन सण. वसुबारस, धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा (आणि बलिप्रतिपदेच्याच दिवशी केली जाणारी अन्नकूटाची पूजा) हे दिवाळीचे दिवस, त्यांची अभिधाने, त्या त्या दिवशी करावयाचे कर्मविधी, त्यामागील संकेत व धारणा हे सारे कृषिसंस्कृतीशी, शेतीच्या संपन्नतेशी आणि तिचा हात धरून घरीदारी नांदणाऱ्या अन्नाच्या शाश्वतीशी अभिन्नपणे जोडलेले आहेत. सुबत्तेच्या आगमनाचा उत्सव साजरा करणारा हा आमचा सुगीचा सण आहे. जगभरच सुगीचे हे उत्सव शेतीच्या स्थानिक वेळापत्रकानुसार साजरे होतात. स्थळकाळवेळ काय ती निराळी, मात्र भावना एकच. (पृष्ठ २९ पहा)

# पूर्वरंगांत रंगलेला चंद्रोत्सव

मनाला टवटवी देणारे, चित्तवृत्ती उल्हसित करणारे शरदाचे टिपूर चांदणे, रूपेरी प्रकाशाची बरसात करणारा चंद्रमा, थंडीची चाहूल देणारा वातावरणातील किंचितसा गारवा, अशा प्रफुल्ल वातावरणात सुरेल सुरांच्या संगतीत स्नेहीमंडळींचे गप्पा-विनोद रंगात आलेले आणि त्याला जोड गरमागरम आटीव, स्वादिष्ट केशरयुक्त मसाला दुधाची. ही अवीट गोडी जिभेवर रेंगाळणारी. असा हा कोजागिरीचा चंद्रोत्सव सर्वांनाच हवाहवासा वाटणारा ! 'को जागर्ति ? - कोण जागा आहे ?' असा प्रश्न विचारणारा हा 'कौमुदी महोत्सव ! जो 'जागा' म्हणजे 'कृतिशील' असेल, त्याच्याकडेच लक्ष्मी येईल असे सुचविणारा ! प्रत्येक क्षेत्रात पुढे जाण्यासाठी मनामनांत 'जाग' व 'आंस' असावी लागते, याकडे निर्देश करणारा हा चंद्रोत्सव सर्वांनाच प्रेरणा देणारा !

चंद्रोत्सव कळायच्या कितीतरी आधीपासून आपली चंद्राशी ओळख होते ती 'चांदोबा चांदोबा भागलास का' या बडबडगीतापासून. मग 'चांदोबाचे कपडे कसे लहान होतात', अशा काही गोष्टी बालमनाचे रंजन करतात. मोठ्यांच्या साहित्यात तर त्याचे स्थान आगळेच आहे. केवळ कोजागिरी पौर्णिमेच्या चंद्रानेच नव्हे तर वर्षभर दर पौर्णिमेला दर्शन देणाऱ्या रजनीनाथाने अनेक कवींच्या प्रतिभेला साद घातली आहे. 'कोणता मानू चंद्रमा, या भूवरीचा वा नभीचा' किंवा 'तेरा चांद सा रोशन चेहरा' अशा काव्यपंक्ती ओठी उमटविणाऱ्या, नीलरंगी आकाशात चमकणाऱ्या शशिबिंबाने जगाला भुरळ घातली आहे. आपल्या शेजारचा चीनही त्यातलाच एक. प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभलेल्या चीनप्रमाणेच कोरिया, व्हिएतनाम, मलेशिया व बाली या देशांमध्येही खास असा चंद्रोत्सव - 'मून फेस्टिव्हल' - साजरा केला जातो. याला Mid-Autumn Festival असेही म्हणतात. खरे तर हा आहे एक सुगीचा उत्सव !

### चिनी चंद्रोत्सव

जुन्या काळी चीनमध्ये चांद्रमासाप्रमाणे कालगणना करण्यात येत असल्याने (जानेवारी ते डिसेंबर अशी पाश्चात्यांची कालगणना चीनने १९११मध्ये स्वीकारली) चांद्रमासाच्या आठव्या महिन्यात येणाऱ्या पंधराव्या दिवशी तेथे चंद्रोत्सव साजरा केला जातो. इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे साधारणतः सप्टेंबर महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात

येणारा हा दिवस चिनी संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. चंद्रोत्सव साजरा करण्यासाठी तेथे सार्वजनिक सुट्टीच असते. संपूर्ण वर्षात या दिवशीचा चंद्र सर्वात जास्त प्रकाश देणारा आणि संपूर्ण गोल असा असतो, असा तेथील समज. पौर्णिमेच्या दिवशी चंद्रावर सशाचे चित्र आढळते, अशी गोष्ट आपल्याकडे सांगितली जाते, तशाच काही मनोरंजक कहाण्या चीनमध्येही प्रसिद्ध आहेत (काही हिन्दी चित्रपटांमधील घटनांचा फारसा विचार करायचा नसतो त्याप्रमाणे इथेही तर्काच्या भानगडीत पडायचे नाही !).

ही कहाणी सर्वात जुनी आहे. ख्रिस्तपूर्व सुमारे २१७० वर्षांपूर्वी, पृथ्वीभोवती दहा सूर्य फिरत होते. सर्वचजण आळीपाळीने पृथ्वीला प्रकाश देत होते. एके दिवशी मात्र सगळे सूर्य एकाच वेळी तिच्यासमोर उभे ठाकले व त्यांच्या प्रखर प्रकाशापायी पृथ्वीची काहिली होऊ लागली, ती भाजून निघाली. त्या वेळी हु यी नावाच्या जुलमी व प्रतापी धनुर्धाऱ्याने शरसंधान करून नऊ सूर्यांना पिटाळून लावले. यानंतर एके दिवशी त्याने देवांकडचा संजीवक द्रवपदार्थ (elixir) पळविला. त्याच्या पत्नीने - चँग एर - हिने तो प्राशन केला. त्यामुळे ती तरंगू लागली आणि त्याची मात्रा जास्तच झाल्याने ती उंचचउंच तरंगत राहिली व काही काळातच चंद्रावर पोहचली. हु यीचे आपल्या पत्नीवर अतिशय प्रेम होते. चँग एरला परत आणता आले नाही तरी पत्नीसाठी त्याने चंद्राला मात्र नष्ट केले नाही.

फार पूर्वी वू कांग नावाचा एक चंचल माणूस होता. त्याला अमर व्हायचे होते. म्हणून मार्गदर्शन घेण्यासाठी तो पर्वतावर गेला. तेथे भेटलेल्या गुरूने त्याला आजार दूर करणाऱ्या काही वनस्पतींची माहिती दिली. पण तीन दिवसांतच तो कंटाळला आणि दुसरे काहीतरी सांगा म्हणून त्यांच्या मागे लागला. मग त्या गुरूंनी त्याला बुद्धिबळ शिकविले. पण तरी तो कंटाळला. मग त्याला काही पुस्तके वाचण्यास दिली. तरीही तो अस्वस्थ झालाच. शेवटी गुरूंनी त्याला चंद्रावर पाठविले व तेथील झाड तोडल्याशिवाय पृथ्वीवर यायचे नाही, असे बजावले. दिवस अन् रात्र झाड तोडून कांग थकला तरी ते जादुई झाड कापून संपले नाहीच. वू कांग आजही झाड तोडतोच आहे, असे म्हणतात.

सशाची एक गोष्ट चीनमध्येही प्रसिद्ध आहे. एकदा तीन संन्यासी भूकेने व्याकूळ होऊन फिरत होते. तेव्हा फिरता फिरता त्यांना कोल्हा, माकड व ससा असे तीन प्राणी भेटले. तीनही संन्याशांनी ह्या तिघांकडे अन्नाची मागणी केली. कोल्हा व माकड यांच्याजवळ देण्यासारखे काहीतरी होते. पण गरीब बिचाऱ्या सशाजवळ काहीच

नव्हते. त्यामुळे जवळच्याच आगीत त्याने उडी मारली व आपले मांसच त्यांना खाण्यासाठी दिले. त्याच्या या अनोख्या त्यागाने आश्चर्यचकित झालेल्या संन्याशांनी त्याला चंद्रावर स्थान दिले.

पौर्णिमेच्या या दिवशी 'मून केक' खाण्याची प्रथा आहे. त्यामागे मात्र लढाईचा इतिहास आहे. इसवीसन १२८०-१३६८ या काळात चीनवर मंगोलवंशियांची सत्ता होती. त्यापूर्वीच्या सुंग राजघराण्याला मंगोलवंशियांचे वर्चस्व मान्य नव्हते. त्यामुळे ते सतत बंड करण्याचा विचार करीत असत. पण मंगोलवंशियांसमोर बंडांची चर्चा करणार तरी कशी ? मग त्यांना एक कल्पना सुचली. चीनमधील केक - विशेषत: मून केक - मंगोलवंशियांना आवडत नसे. त्यामुळे ते या केककडे ढूंकूनसुद्धा पाहात नसत. म्हणून बंडाची आखणी करणारे नेते संदेशांची देवाणघेवाण करू लागले ते या केकद्वारे. केकमध्ये लपलेले गुप्त निरोप सर्वांना पोहचून बंडाचा दिवस उजाडला. 'मून फेस्टिव्हल'च्या रात्रीच बंड करणाऱ्यांनी मंगोलवंशियांवर हल्ला करून त्यांचे सरकार उलथून पाडले. यानंतर १३६८ मध्ये तेथे मिंग राजघराण्याची सत्ता प्रस्थापित झाली. या घटनेचे स्मरण म्हणून 'मून फेस्टिव्हल'ला 'मून केक' खाण्याचे महत्त्व आहे.

'मून फेस्टिव्हल'ची आणखी एक गंमत म्हणजे ऑगस्ट महिन्यात येणारा पौर्णिमेचा दिवस हा 'विमेन्स फेस्टिव्हल'चा असतो. चिनी संस्कृतीप्रमाणे चंद्र हा सौंदर्याचे, स्त्री तत्वाचे प्रतीक मानला जातो. या दिवशी फक्त लहान मुलांनाच चंद्रावर एका तरुणीचे दर्शन होते व ती लहानग्यांच्या इच्छा पूर्ण करते असेही म्हटले जाते. प्रियकर-प्रेयसीच्या मीलनाच्या या दिवशी प्रेमाचे काव्य चीनमध्येही बहरते.

चीनमधील 'मून फेस्टिव्हल'च्या कहाण्यांना असे विविध संदर्भ असले तरी त्याची मुख्य प्रेरणा आहे ती मुबलक अन्नधान्य उपलब्ध झाल्याची! म्हणून निसर्गाचे आभार मानण्याची! शिवाय चीन हा कृषिप्रधान देश असल्याने भारताप्रमाणे तेथेही शेतीला महत्त्व ! त्यामुळे शेतातील तयार धान्य घरच्या दिशेने वळू लागले की सर्वत्र समाधानाचे वारे वाहू लागायचे. त्यातच वातावरण आल्हाददायक, मग नाचगाणी-खाणेपिणे अशी धामधूम उडणे स्वाभाविकच ! समाधानाने भरलेला हा दिवस नवीन मैत्रीलाही निमंत्रण देतो. पौर्णिमेचा चंद्र हे समृद्धीचे प्रतीक ! त्याच्यामुळे सुदैव प्राप्त होणार व शुभ घटनाही घडणार असा समज ! मग या शुभंकराचे दर्शन घेणेही ओघाने आलेच. लहानथोर सर्वांनी घराबाहेर पडून चंद्रप्रकाशात मन प्रसन्न करण्याचा हा उत्सव चिनी संस्कृतीत महत्त्वाचा ठरला आहे.

## कोरियाचा 'Ch'usok'

विसाव्या शतकात उद्योजकतेचा वसा घेतलेल्या आणि एकविसाव्या शतकातही तो टिकविणाऱ्या कोरियात हजारो वर्षांपूर्वीची सांस्कृतिक परंपरा व धर्मकृत्ये जपली जातात. सांस्कृतिक परंपरा जपणारा 'Ch'usok' हा Harvest /Moon Festival अतिशय उत्साहाच्या वातावरणात कोरियात साजरा करण्यात येतो. चीनप्रमाणेच कोरियातही चांद्रमासाप्रमाणे येणाऱ्या आठव्या महिन्यातील पंधरावा दिवस 'Ch'usok'चा असतो. पीकपाण्याने, फळाफुलांनी समृद्ध झालेल्या निसर्गाप्रती आदर व्यक्त करण्याचा हा दिवस. 'Ch'usok'चा अर्थही विपुलता असाच आहे. साधारणपणे सप्टेंबर महिन्यात येणाऱ्या 'Ch'usok'ला सुमारे दोन हजार वर्षांची परंपरा आहे. राष्ट्रीय सण म्हणून त्याचे महत्त्व असून त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असते. कार्यालयीन व्यवहार, दुकाने बंद असतात. मात्र, सणानिमित्त घराबाहेर पडणाऱ्यांची जत्राच असते. इष्टमित्रांना सहकुटुंब, सहपरिवार भेटण्याचा हा दिवस असतो. विशेषतः, आपले आई-वडिल व इतर ज्येष्ठ नातेवाईकांची भेट घेण्याचा रिवाज या दिवशी आवर्जून पाळला जातो. 'Ch'usok'च्या दिवशी सकाळी पितरांचे स्मरण (आपल्याकडील पितृपंधरवड्याप्रमाणे तेथेही पितरांना मान दिला जातो) आठवणीने केले जाते. नोकरी-उद्योगांसाठी शहरांत आलेले नागरिकही आपल्या गावी जाऊन पितरांना आदरांजली वाहण्याचा परिपाठ पाळत असल्याने रेल्वे, बसगाड्या यांना भरपूर गर्दी असते. आपल्याकडे जशी दिवाळीनिमित्त जादा गाड्यांची सोय केली जाते, त्याप्रमाणे कोरियाच्या सरकारलाही 'Ch'usok'साठी अतिरिक्त गाड्या सोडाव्या लागतात.

हा कौटुंबिक सण असल्याने सर्वांसाठी नवे रंगीत कपडे शिवले जातात. नातेवाईकांच्या भेटीगाठी घेणे - भेटवस्तूंची देवघेव या रीती तेथे पाळल्या जातात. मुबलक प्रमाणात उपलब्ध झालेले धान्य-फळे इत्यादींचा या भेटींमध्ये समावेश असतो. 'Ch'usok'च्या पूर्वसंध्येला स्त्रिया फेर धरतात, गाणी तर या वेळी आवश्यकच ! दुसऱ्या दिवशीही मुखवटे घालून केलेले लोकनृत्य व इतर लोककला यांच्या सादरीकरणाला महत्त्व असते. या दिवशी विविध खेळही खेळले जातात. रस्सीखेच व इतर क्रीडाप्रकारांनी मन रमविले जाते. या दिवशीचे जेवण हे देखील विशेष असते. सूप, फळे, मशरूम आणि विविध पदार्थ घालून केलेले चंद्रकोरीच्या आकारातील भाताचे केक Songp'yon हा यातील एक विशिष्ट पदार्थ. 'Ch'usok' म्हणजे मनोरंजन आणि नातेवाईकांबरोबर विरंगुळा, 'Ch'usok' म्हणजे निसर्गाप्रती आभार, असे त्याचे स्वरूप असते.

## व्हिएतनाममध्ये बालमहोत्सव - Trung Thu

पूर्वेकडील देशोदेशींच्या सुगीच्या उत्सवाला स्थानिकतेचे परिमाण लाभले आहे. अमेरिकेबरोबरच्या युद्धामुळे वाताहत झालेल्या व्हिएतनामनेदेखील आपली स्थानिक वैशिष्ट्ये जपली आहेत ती बालमहोत्सवाद्वारे. व्हिएतनाममधील चंद्रोत्सवात केंद्रस्थानी आहेत देशाचे भविष्य असणारी बालके. चीन व कोरियाप्रमाणेच चांद्रमासाच्या आठव्या महिन्यात येणारा पंधरावा दिवस हा व्हिएतनाममधील सर्वांत लोकप्रिय कौटुंबिक दिवस आहे. या सणाला Trung Thu असे म्हटले जाते. या दिवसाचे सगळे कार्यक्रम बालकेंद्री असतात. कारण भरपूर अन्नधान्य उपलब्ध व्हावे यासाठी या दिवसाआधीचे अनेक महिने शेतीच्या कामात आई-वडिल इतके गुंतलेले असतात की त्यांना मुलांना वेळच देता आलेला नसतो. त्यामुळे त्या गेलेल्या वेळेची भरपाई म्हणून हा दिवस फक्त बालकांचाच ! अपत्यांवरील प्रेमाच्या आनंदाचा ! मग पालकांनी आणि एकूणच समाजाने बालगोपालांचे कौतुक करायचे, त्यांना खाऊ-खेळणी, पुस्तके द्यायची आणि त्यांच्या निरागस भावविश्वाचे जवळून अवलोकन करायचे. 'बालकांचे शिक्षण' हा तर या दिवसाचा विशेष जिव्हाळ्याचा विषय. शिक्षणात यश मिळावे म्हणून या चिमण्या पाखरांची कंदिलयात्रा काढण्यात येते. मग, तरतऱ्हेच्या कंदिलांनी, नवनवीन कपड्यांनी, खाऊ-खेळण्यांनी येथील बाजारपेठ सजलेल्या दिसतात. चंद्रोत्सव असल्याने असेल वा आकाशातील ताऱ्यांशी मैत्रीमुळे असेल पण चांदणीच्या आकारातील कंदिल लहानग्यांच्या अधिक आवडीचे असतात. वेगवेगळे मुखवटे घालणे, हस्तकला आणि विविध खेळ हेदेखील या बालमहोत्सवाची रंगत वाढवतात व सर्वांसाठी निर्मळ आनंदाची पखरण करतात.

आपल्या पूर्वजांप्रती आदर दर्शविणे, हे या दिवसातील आणखी एक मोठे कर्तव्य मानले जाते. पितरांचे स्मरण करताना उदबत्त्या लावणे आणि खोट्या नोटांची बंडले जाळणे हे गरजेचे ! नोटा या तेथे सुदैवाचे प्रतीक असतात आणि उदबत्तीच्या धुरात या नोटांचा धूर मिसळून गेल्याने तो पूर्वजांपर्यंत पोहचतो असा समज ! भूतकाळाला विसरायचे नाही पण भविष्याकडे विशेष लक्ष द्यायचे या भावनेतून कदाचित तेथे बालमहोत्सव व पितरांचे स्मरण या दोन्हींना एकाच दिवशी महत्त्व देण्यात येत असावे. या उत्सवामागील भावना कोणतीही असली तरी शेते बहरल्याने, निसर्गाने उदार अंत:करणाने झोळीत धान्य भरल्याने समाधान मिळालेल्या समाजाने उद्याचाही विचार करून त्यासाठी कृतिशील बनावे, असे यातून सूचित होते.

## भाताचा जपानी उत्सव

'उगवत्या सूर्याचा देश' असलेल्या जपानने अर्थउद्योगात केलेली प्रगती विस्मयकारक आहे. अणुबाँबच्या प्रचंड विध्वंसाने खचून न जाता पुन्हा उभे राहणाऱ्या जपानने विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात फार मोठी प्रगती केली आहे. आधुनिकतेला महत्त्व देणाऱ्या जपानला 'पूर्वेकडील अमेरिका' असे संबोधले जाते. जपानची कार्यसंस्कृती जगात नावाजली गेली आहे. जगातील अनेक कंपन्यांनी जपानच्या व्यवस्थापनातील 'काइझेन'चे महत्त्व ओळखून त्याचा स्वीकार केला आहे. 'रोबोटिक्स', 'नॅनोटेक्नॉलॉजी' आणि 'स्टेम सेल रीसर्च' या अत्याधुनिक विज्ञानक्षेत्रांत प्रगती करणारा जपान शांततेचा संदेश देणाऱ्या बौद्ध धर्माच्या प्रसार-प्रचारातही मागे नाही. आधुनिकतेची कास धरणाऱ्या जपानने आपल्या संस्कृतीलाही घट्ट धरून ठेवले आहे. तेथील संस्कृती श्रमाचे महत्त्व जाणणारी आहे, अन्नधान्याच्या सुरक्षेला महत्त्व देणारी आहे. ज्या सूर्याच्या ऊर्जेमुळे पृथ्वीवरील व्यवहार घडतात त्या सूर्याला नववर्षाच्या प्रारंभी प्रणाम करणारी ही संस्कृती आहे.

जपानचे नवीन वर्ष चालू होते एक जानेवारीलाच. पण तेथे आणखी एक छोटे नववर्षही साजरे केले जाते. हे नववर्ष म्हणजे तेथील 'राइस फेस्टिव्हल' होय. हा तेथील 'सुगीचा उत्सव' असेही म्हणता येईल. या उत्सवाचे नाव आहे 'Koshogatsu' - याचा शब्दशः अर्थ आहे छोटे नववर्ष ! नववर्षाच्या सुरुवातीला म्हणजे जानेवारी महिन्यात येणाऱ्या पहिल्या पौर्णिमेला हा उत्सव साजरा केला जातो. भातशेती उत्तम होऊन मुबलक प्रमाणात तांदूळ उपलब्ध झाल्याने देवतांना/निसर्गाला नैवेद्य दाखवणे म्हणजे भाताचा उत्सव साजरा करणे होय. त्या वेळी देवतांच्या मिरवणुका, त्यात नृत्य-संगीत या सर्व बाबींना महत्त्व येतंच. वाद्यवृंदही सज्ज असतो. विशिष्ट पद्धतीने तयार केलेला कागदी पंखा हाती घेऊन व Kimono (तेथील पारंपरिक पोशाख) घालून युवतीही यात सहभागी होतात. जेवणावळीही आयोजिल्या जातात. हा उत्सव झाल्याखेरीज नवीन तांदूळ खायचा नाही, ही परंपरा/रीत तेथे जपली जाते. जपानचे राजघराणेही या उत्सवात मागे नसते. राजाने तर या उत्सवाच्या मध्यरात्री देवतांना नैवेद्य दाखवायचा असतो. काही प्रांतात Yagan Orimi या नावाने सुगीचा उत्सव असतो. याशिवाय जपानमध्ये १५ सप्टेंबरच्या सुमारास येणाऱ्या पौर्णिमेला चंद्रदर्शन करण्याचाही प्रघात आहे. चंद्रोदय पाहणे आणि तांदूळाच्या पिठापासून तयार केलेला विशेष पदार्थ (उकडीच्या मोदकासारखा) खाणे हे या दिवसाचे वैशिष्ट्य असते.

## 'भात नाही तर जीवन नाही'

देश बदलला, वेष बदलला, संस्कृती आणि चालीरीती बदलल्या तरी संपूर्ण मानवजातीसाठी काळजीची एक गोष्ट मात्र समान राहिली आहे आणि ती म्हणजे अन्नधान्याची सुरक्षितता. साहजिकच मुबलक धान्य उपलब्ध झाले की काळजीची जागा समाधानाने घेतली जाते आणि समाधानातून सौख्याकडे, आनंदाकडे वाटचाल चालू होते. आनंद वाटला की तो अधिक वाढतो आणि तो वाटण्यासाठीच तर सणउत्सव असतात. आनंद वाटण्याचा मलेशियातील उत्सव आहे Gawai Dayak म्हणजे भाताचा उत्सव. साधारणपणे जून महिन्याच्या २ तारखेला तो साजरा करण्यात येतो. शेतीविषयक प्रदर्शने, सांस्कृतिक कार्यक्रम, गुरांच्या शर्यती आणि इतर पारंपरिक खेळांचे आयोजन या वेळी करण्यात येते. या उत्सवात 'राइस वाईन'ला महत्त्व असून ती मुबलक प्रमाणात उपलब्ध असते. मलेशियात संपूर्ण कुटुंबच कापणीच्या वेळी भाताच्या शेतीसंबंधीची विविध कामे करीत असते. कापणीसाठी विशिष्ट प्रकारचा कोयता असतो. भाताच्या पिकांमधील तत्त्वाला आवाहन करण्याचे काम या कोयत्याच्या वक्राकार मुठीद्वारे घडते, असा समज आहे.

Saba Hansतर्फे साजरा केला जाणारा Kadazan Harvest Festival किंवा Tadan Ka'amatan असाही एक उत्सव तेथे आहे. साधारणपणे दरवर्षी मे महिन्यात तेथे हा उत्सव साजरा होतो. या उत्सवातील श्रद्धा अशी आहे की भाताच्या भाताच्या पिकांत Kinoingan वा Bambaazon असे एक तत्त्व असते. जगाच्या निर्मितीचे काम त्यामुळे घडून येते. भाताच्या पिकात, तांदुळाच्या दाण्यांत आणि शिजविलेल्या तांदुळात हे तत्त्व उतरलेले असते. जीवनाला आधारभूत असे हे तत्त्व असल्याने 'भात नाही तर जीवन नाही', असे तेथे मानले जाते. परंपरागत पोषाख घालून उत्साहाच्या वातावरणात हा सण साजरा केला जातो. Sarawak येथे जून महिन्याच्या एक-दोन तारखेकडेच हा उत्सव साधारणपणे अशा प्रकाराने साजरा होतो. फक्त तेथील नागरिक आधी जंगलात जाऊन निसर्गाचे आभार मानतात व 'पुढच्या वर्षीही असेच घडो', अशी प्रार्थना करतात. Kadazandusun व Murut हे नागरिक Pesta Keamatan हा उत्सव साजरा करतात. उत्तम पिक आल्याबद्दल निसर्गाचे आभार मानण्यासाठी हे नागरिक भाततत्त्वाला आदरांजली वाहतात. या तत्त्वाला कीड अथवा नैसर्गिक संकटांपासून धोका असतो, असे मानले जाते आणि हा धोका टाळण्यासाठी धार्मिक विधी करणाऱ्या व्यक्तींकडून विशिष्ट विधीही केले जातात. हा धोका टळला

की सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण होते. मग आनंदोत्सव चालू होतो. खेळ, नाच-गाणी मनोरंजनाचे प्रकार आदींची धामधूम असते. या वेळी मांसाहाराला महत्त्व असते शाकाहार करणे हा त्या तत्त्वाचा अपमान समजला जातो. मुस्लिम देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मलेशियातील हा सुगीचा उत्सव भाततत्त्वाचा जीवनोत्सव आहे.

**बालीचा 'देवी श्री'**

पर्यटकांना आकर्षित करणारा आणि अतिरेक्यांनी बॉंबस्फोट केल्याने गाजलेला हा एक लहानसा भूप्रदेश - हे एक छोटेसे बेट - आपली संस्कृती टिकवून आहे. इंडोनेशियाचाच हा खरे तर एक प्रांत. पण आपली अस्मिता टिकविणारा. या देशावर हिंदू संस्कृतीचा व बौद्ध धर्माचा प्रभाव पडला आहे. बालीमध्ये बरीच मंदिरे असून त्यांच्या परिसरातच गावे वसलेली आहेत. धार्मिक कार्ये मंदिरांमध्येच केली जातात. आध्यात्मिक जीवन, मानवी जीवन आणि सभोवतालचा निसर्ग या तीन कोनांचा विचार येथील संस्कृतीत प्रामुख्याने केला जातो. सुगीच्या उत्सवाच्या दिवशी 'देवी श्री' या भातदेवतेला महत्त्व असते. हा उत्सव महत्त्वाचा मानला जातो व तो Nyepi या नावाने ओळखला जातो. तो मार्च-एप्रिलमध्ये साजरा होतो. तर, येथील चंद्रोत्सव साधारणपणे सप्टेंबर महिन्यात असतो. गावागावांच्या मंदिर परिसरात साजरा होणारा Nyepi हा उत्सव समाजाने एकत्र येऊन साजरा करायचा असतो. यासाठी सर्व नागरिकांनी तन-मनाने शुचिर्भूत होणे हे गरजेचे असते (त्यामुळे कदाचित आपापसातील तंटे सुटण्यासही मदत होत असावी). निसर्गाच्या वरदहस्तामुळे धान्यांची रेलचेल झाली असल्याने शेतकऱ्यांनी देवांचे स्मरण करायचे आणि पुढील वर्षीही अशीच समृद्धी मिळावी यासाठी प्रार्थना करायची असते. या वेळी गावांमध्ये विविध प्रकारच्या स्पर्धा, नृत्य-संगीत इत्यादींचे आयोजन केले जाते. मिरवणुकाही काढण्यात येतात.

पूर्वरंगात रंगलेल्या चंद्रोत्सवाच्या - विशेषतः सुगीच्या उत्सवाच्या या काही मनोरंजक छटा ! गंमत म्हणजे सूर्याच्या ऊर्जेमुळे अन्नधान्य पिकविणाऱ्या मानवाने धान्याचा उत्सव मात्र चंद्राच्या साक्षीने साजरा केला आहे. शिवाय आजच्या विज्ञानयुगात मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले असले तरी त्यांचा मनमोहक प्रकाश मानवाला आकर्षित करतोच आहे, मनामनांत चैतन्य निर्माण करतोच आहे. म्हणूनच पृथ्वीतलावर आपली संस्कृती जपणाऱ्यांच्या मनांशी संवाद साधणारे, काव्यभावना जागविणारे चंद्र आणि मानव यांच्यातील आल्हादक नाते मात्र अतूटच राहिले आहे !

# दुष्काळाची उडविली हुर्यो

आधुनिक मानव जेथून जगभर पसरला त्या आफ्रिकेतील देशांची आजची ओळख 'तिसरे जग' अशी आहे. मात्र या खंडाला नैसर्गिक वैविध्याचे दान भरभरून मिळाले आहे. पृथ्वीचा सुमारे एक पंचमांश भाग व्यापलेल्या या मोठ्या खंडात बर्फाने आच्छादलेले किलिमांजारो हे शिखरही आहे आणि नजरेच्या टापूत न मावणारे सहारासारखे विस्तीर्ण वाळवंटही आहे. कुठे घनदाट जंगले आहेत तर कुठे खुरटलेली झाडे-झुडूपे आढळतात. नाईलसारख्या नद्यांनी येथील जमीन सुपीक बनली आहे. विस्तीर्ण भूप्रदेश व्यापलेल्या या खंडात विविधतेने नटलेले अनेक देश आहेत. भौगोलिक विविधतेबरोबरच वांशिक, भाषिक व सांस्कृतिक विविधताही तेथे आढळते. साधारणपणे उत्तर आफ्रिकेतील देशांमध्ये इस्लामचा प्रभाव आहे. दक्षिणेकडील भागांत वसाहतवाद्यांच्या प्रभावामुळे पाश्चात्यांचा प्रभाव जाणवतो. या भागांतील नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारांवर त्यांची छाप पडलेली आढळते.

निसर्गातील विविधतेप्रमाणेच येथील मानवसमूहांमध्येही वैविध्य आहे. अनेक जाती-जमातींचे येथे वास्तव्य आहे. त्यांच्यात कुठे वैमनस्य आहे तर कुठे सहजीवन. गटागटांमधील भिन्नतेप्रमाणे तेथे भाषेतही बदल होत गेला आहे. आफ्रो-आशियाई या गटात मोडणाऱ्या सुमारे अडीचशे भाषा येथे बोलल्या जातात. मात्र आफ्रिकेतील संस्कृतीचा विचार करता अरबी, Swahili आणि Hausa या भाषा महत्त्वाच्या ठरलेल्या दिसतात. निसर्गाच्या विविध रूपांनी सजलेल्या या खंडात शेती महत्त्वाची ठरली नसती तर नवलच ! साहजिकच तेथील सुगीचा उत्सवही तेवढाच महत्त्वाचा आणि आनंदाचा! हा उत्सव आहे Homowo Festival किंवा Yam Festival !

Homowo Festival प्रामुख्याने साजरा करण्यात येतो घानातील 'गा' नागरिकांकडून. Homowo या शब्दाचा अर्थ आहे 'भूकेची हुर्यो उडविणे/उपहास करणे'. असा अर्थ या सणाला का प्राप्त झाला ? माणूस भटक्या होता तेव्हाची ही गोष्ट. भटकंती करीत असताना 'गा' ही जमात घानाच्या दिशेने मजल दरमजल करीत होती. त्या वेळी वाटेत त्यांना बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागला. विशेषतः दुष्काळामुळे त्यांचे फारच हाल झाले.तरी एकमेकांना मदत करत ते कसेबसे घाना येथे

पोहचले. तेथे स्थायिक झाल्यानंतर त्यांना शेतीतून भरपूर धान्य उपलब्ध झाले तेव्हा त्यांनी पूर्वी भोगलेल्या दुष्काळाची हुर्यो उडविली व आनंदोत्सव साजरा केला. ही Homowo Festival ची सुरुवात. यालाच Yam Festival असेही म्हटले जाते. कारण Yam हे तेथील महत्त्वाचे पीक आहे. Yam म्हणजे एका प्रकारच्या झाडाचे मूळ (root) होय. घानाच्या समाजजीवनात Yamचे महत्त्व इतके आहे की शेतातून ते घरी आणल्यानंतर गावातील मुख्य पुजाऱ्यासमोर ठेवून त्यांचे आशीर्वाद घेतले जातात. ते ट्यूबच्या आकारासारखे असते, पण रताळ्यापेक्षा (sweet potato) वेगळे असते. कापल्यानंतर सूर्यप्रकाशापासून दूर व थंड जागेत ठेवल्यास ते दोन महिने टिकते. वाळवून त्याचे पीठही करून ठेवता येते. नवजीवाच्या आगमनानंतर सुईणीचे, दाईचे काम करणाऱ्या स्त्रियांना Yam पासून विविध पदार्थ तयार करून विशेष जेवण दिले जाते. Homowo Festivalसाठी Yamचे विविध खाद्यपदार्थ बनविण्यात येतात. विशेषतः Yam पासून तयार केलेला पदार्थ उकडलेल्या अंड्याबरोबर खाण्याची परंपरा आहे. अमेरिकेतील सुगीच्या उत्सवातही Yamला महत्त्व देण्यात आले आहे.

हा उत्सव साधारणपणे ऑगस्ट महिन्यात साजरा केला जातो. धर्मगुरू सांगतात ती तारीख (बरेच वेळा वार मात्र शनिवारच असतो) यासाठी निश्चित केली जाते. तीन ते चार दिवस साजरा होणारा हा उत्सव मौजमजेसाठी असतो. ऑगस्ट महिन्यात हा उत्सव साजरा होत असला तरी त्याचे वेध लागतात ते मे महिन्यापासून. शेतीची कामे चालू होऊन नवीन पीक कोणते घ्यायचे, ते या काळात ठरते. एकीकडे, 'चांगले पीक येऊ दे' यासाठी निसर्गाला साकडे घातले जाते. दुसरीकडे, उत्सवाची तयारी मनामनांत आकार घेत असते. मात्र खरा सण साजरा होतो तो उपजीविकेसाठी बाहेरगावी गेलेले हजारो 'गा' नागरिक आपल्या गावी परततात तेव्हा.

उत्सवाची तारीख निश्चित झाल्यानंतर त्या आधी येणाऱ्या गुरुवारी (या गुरुवारला काय महत्त्व आहे हे समजू शकले नाही) नागरिक आपल्या गावी दाखल होतात. या नागरिकांना Thursday People किंवा Soobii म्हटले जाते. बाहेरगावाहून आलेले हे नागरिक, स्थानिक नागरिक आणि संगीत-नृत्य मिरवणुकीत सहभागी होणारे कलाकार असे सर्व मिळून हा उत्सव साजरा करतात. या वेळी मिरवणुकीत सहभागी झालेले कलाकार राजा-राणीचे वेष परिधान करतात. नृत्य-संगीत याचे महत्त्व असतेच. या उत्सवासाठी kente कापडापासून तयार केलेला

toga हा रंगीबेरंगी पोषाख घालण्याची परंपरा आहे. तरुण-तरुणींसाठी हे दिवस विशेष आनंददायी असतात. कारण, हा आठवडा म्हणजे तेथील वधू-वर संमेलनच असते. परस्परांशी परिचय करून घेणे व मनोमीलन झाल्यास गृहस्थजीवनाचा प्रारंभ करणे, हे या उत्सवाच्या निमित्ताने घडते.

दु:ख आणि आनंद (तसेच जन्म व मृत्यूदेखील ?) या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात, असे म्हणतात. 'गा' नागरिकांची भूमिका अशी असावी. कारण, हा उत्सव आनंदाचा असला तरी पितरांची, गेलेल्या व्यक्तींची आठवण त्या वेळी आवर्जून केली जाते. म्हणून शुक्रवारी सकाळी घराघरांतून सुतकी वातावरण असते. कुठे रडारडही असते. पण सकाळ दु:खात घालविली तरी नंतरचा दिवस मात्र आनंदाचा असतो. जुळी व तिळी मुले हा देवाचा प्रसाद समजून त्यांचे विशेष कौतुक केले जाते.

शनिवारचा दिवस हा उत्सवाचा मुख्य दिवस असतो. या दिवशी गावजेवणासाठी मोठ्या प्रमाणावर स्वयंपाक केला जातो. या वेळी corn meal आंबवून व वाफवून kpekpele हा खास पदार्थ केला जातो. मासे व पाम सूप यांच्याबरोबर kpekpele खाण्याला महत्त्व असते. देवासाठी व पूर्वजांसाठी नैवेद्य म्हणून हे kpekpele घराघरांत विशिष्ट जागी ठेवण्यात येते. हा दिवस मिरवणुकीचा व अनोळखी माणसांनी कोणत्याही घरांत जेवायचा असतो. किंबहुना ओळख नसलेल्या ठिकाणी जेवण्यास जाण्यासाठी उत्तेजन दिले जाते. आनंद वाटण्याचा हा प्रकार रविवारी सकाळपर्यंत चालतो. रविवारी 'गा' नागरिकांचे नवीन वर्ष चालू होते व Homowo Festival संपतो.

आफ्रिकेतील बार्बाडोसमध्ये साजरा करण्यात येणारा सुगीचा उत्सव आहे crop over. जून महिन्याच्या शेवटच्या दोन आठवड्यांत व जुलैच्या पहिल्या पंधरवड्यात हा उत्सव असतो. या वेळी शेतकामगार बैलगाड्यांच्या आणि बैलांच्या मिरवणुका काढतात. मालकवर्ग सर्व कामगारांना जेवण देतात. 'हँडिंग' नामक व्यक्तीची काळे कपडे घातलेली प्रतिमा एका गाडीवर उभी केलेली असते. पूर्वीच्या काळातील क्रूर गटाचे प्रतिनिधित्व करणारी ही काल्पनिक व्यक्ती भविष्यातील अडचणींची आठवण करून देते, असे म्हटले जाते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मागे पडलेला हा उत्सव १९७०च्या दशकात पुन्हा नव्याने चालू करण्यात आला. मात्र, या उत्सवाचे ग्रामीण स्वरूप आता शहरी झाले आहे. जत्रा, नृत्य-संगीत व मनोरंजनाचे इतर प्रकार यांना आता महत्त्व आले आहे. अंगावर विविध प्रकारची चित्रे काढून व रंगीत कपडे घालून लोक आपला आनंद व्यक्त करतात. कॅलिप्सो संगीताला विशेष पसंती असते.

झांबियातील नागरिक N'cwala हा उत्सव २४फेब्रुवारीस साजरा करतात. पूर्व भागातील Ngoni नागरिक १८३५मध्ये या भागात प्रथम आले. या घटनेची आठवण म्हणून हा उत्सव साजरा करण्यात येत असला तरी त्या मागे डोलणाऱ्या पिकांचा संदर्भही आहेच. नव्या हंगामातील पिकाचा पहिला वाटा हा आपल्या जमातीच्या प्रमुखाला - गटनेत्याला - अर्पण करायचा, अशी प्रथा या नागरिकांमध्ये आहे. अर्पण करण्याचा हा विशेष समारंभ जेथे असतो तेथे इतर गावप्रमुख आपल्या लवाजम्यानिशी (नृत्य-संगीत-वाद्यवृंद इत्यादींसह) दाखल होतात. गटप्रमुखांसमोर कला सादर केली जाते. उत्तम नृत्य करणाऱ्यांचा सत्कार गटप्रमुखाच्या हस्ते करण्यात येतो.

'ग्रीन कॉर्न फेस्टिव्हल' असाही एक उत्सव आफ्रिकेत असतो. ओढे -नदी यांच्या काठी, पाणवठ्याजवळ वा तलावाजवळ ज्या काही भाज्या-फळफळावळ आदी उपलब्ध होते, त्याप्रीत्यर्थ हा उत्सव साजरा केला जातो.

आफ्रिकेतील एक प्रमुख देश असलेल्या नायजेरियात Argungu Fishing Festival फेब्रुवारी व मार्च महिन्यात साजरा केला जातो. पिकांची वाढ पूर्ण झाल्याचा आणि कापणीचा हंगाम चालू होण्याचा हा काळ असतो. या Fishing Festival साठी या Argungu नदीच्या साधारणपणे एक मैल परिसरातील प्रवाहाला संरक्षित क्षेत्र घोषित करण्यात येते. हेतू हा की सुमारे ४५ मिनिटे चालणाऱ्या या उत्सवासाठी तेथे मासे जास्त प्रमाणात मिळावेत (मासेमारीसाठी निश्चित केलेली ठरावीक वेळ संपल्यानंतर तेथे चक्क माशांवरून भांडणेही होतात). खोल पाण्यात सूर मारण्याच्याही स्पर्धा होतात. नायजेरियातील Igbo नागरिक Onwasato Festival साजरा करतात. धान्याच्या उपलब्धतेमुळे आनंदित झालेले नागरिक निसर्गाचे आभार मानण्यासाठी, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या वेळी एकत्र येतात.

बेनिन या आकारमानाने लहान असलेल्या देशात पावसाळा संपल्यानंतर 'बेनिन उत्सव' साजरा होतो. वधू -वरांचे अनौपचारिक मेळावे या वेळी आयोजित केले जातात. शरीरावर चित्रे काढणे हा युवक-युवतींचा आवडीचा भाग असतो. विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते.

निसर्गाच्या वैविध्याने नटलेल्या आफ्रिकेतील सुगीच्या उत्सवामागील प्रेरणा निसर्गाचे आभार मानण्याची आहे. अनौपचारिक वधूवर मेळाव्यांद्वारे तेथील समाजांमध्ये असणारे सामाजिक भानही या निमित्ताने दिसून येते.

# दक्षिण अमेरिकेत ‘ग्रीन कॉर्न’ आणि ‘ग्रेट मून’

प्रगतीच्या मागे धावणाऱ्या माणसाचे अलीकडच्या काळात निसर्गाकडे दुर्लक्ष झाले असले तरी त्याच्या पूर्वजांना मात्र निसर्गाचे महत्त्व पटलेले होते. म्हणूनच जगभरात अनेक ठिकाणी निसर्गाने भरभरून दिलेल्या दानाचा आनंदोत्सव निसर्गाच्या सान्निध्यात साजरा करण्याची पद्धत रूढ झाली असावी. दक्षिण अमेरिकेतील देशही यात मागे नाहीत. तेथील Creek, Cherokee, Seminole, Yuchi, Iroqyois इत्यादी गटांचे नागरिक सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात ‘ग्रीन कॉर्न फेस्टिव्हल’ साजरा करतात. या उत्सवाची तारीख नक्की नसते, पण पिकांची कापणी चालू होण्याच्या सुमारास येणाऱ्या पौर्णिमेला तो साजरा होतो. सुमारे सहा-सात दिवस चालणाऱ्या या उत्सवाच्या वेळी साधुपुरुषांचे महत्त्व असते. चैतन्ययुक्त जीवन, उत्तम आरोग्य आणि आध्यात्मिक शक्ती यांचे प्रतीक म्हणजे हे साधुपुरूष असे मानले जाते. उत्सवाच्या सुरुवातीला घरादाराची आणि तनमनाची स्वच्छता करणे अगत्याचे गणले जाते. या काळात उपासही केले जातात. सर्व स्त्री-पुरुष अंर्तबाह्य शूचिर्भूत होण्यासाठी वनौषधींपासून तयार केलेले (काढ्यासारखे) एक विशेष पेय पितात. समाजातील सर्वांनी परस्परांचे आभार मानणे आणि (गैरसमज असल्यास ते दूर करून) परस्परांना उदार अंत:करणाने क्षमा करणे, याला या वेळी महत्त्व दिले जाते. नव्या हंगामातील मक्याचे रोस्ट कॉर्न, कॉर्न सूप, कॉर्न ब्रेड असे विविध पदार्थ खाणे आणि नृत्य-संगीत, खेळ आदी मनोरंजनाचे प्रकार असतातच. तरुण-तरुणींसाठी विशेष प्रकारचा चेंडूचा खेळ आणि तरुणींचे रिबिन नृत्य हे या उत्सवाचे वैशिष्ट्य.

काही ठिकाणी ऑक्टोबर महिन्यात ‘ग्रेट मून’ वा Checo i-equa हा उत्सव साजरा करण्यात येतो. आद्य स्त्री मानल्या गेलेल्या ‘सेलू’ या महिलेचे स्मरण या उत्सवात केले जाते. या आद्य स्त्रीचे तत्व कॉर्नमध्ये उतरते असा एक समज आहे. मानवाचे पोषण करणाऱ्या धरित्रीचे आभार मानायचे, तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करायची हे या सणाच्या वेळी आवर्जून केले जाते. काही भागांत Brush Feast Festival हा उत्सव असतो. जंगलातून मिळणाऱ्या मेव्याची आठवण ठेवण्याचा हा एक प्रकार. या उत्सवानंतर (कदाचित पावसामुळे थांबलेल्या) जंगलातील भटकंतीला पुन्हा सुरुवात करायची असते.

# ANNOUNCEMENT

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

is pleased to announce the following scheme recently introduced for subscription of the ***Journal of Indian School of Political Economy (JISPE)*** for the Block Period of Three and Five years at a substantial concession resulting in huge savings (up to 33.3%) to the new as well as existing subscribers as under, provided that the subscription amount is remitted in lump-sum on or before 31st December 2007.

| ***Subscription Category*** | ***Yearly Subscription*** | ***Three Year subscription*** | ***Five Year Subscription*** |
|---|---|---|---|
| *Universities & Institutes* | *Rs. 600/-* | *Rs. 1500* | *Rs. 2000/- Plus ** |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 300/-*** | ***Rs. 1000/-*** |
| *Individuals & Colleges* | *Rs. 300/-* | *Rs. 750/-* | *Rs. 1000/-* |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 150/-*** | ***Rs. 500/-*** |
| *Savings Per cent* | *Nil* | *16.2%* | *33.3%* |

* Statistical supplement to the special issue of the JISPE on 'Political Parties and Election in Indian States : 1990-2003' comprising 335 pages and costing Rs.325/- absolutely free till stocks last.

**For more details write or email to:**

The Administrative Officer,
Indian School of Political Economy,
'Arthabodh', 968/21-22, Senapati Bapat Road,
Pune 411016

Email : ispe@vsnl.net — Phone - 25657132
Fax - 25657697 — - 25657210

# पश्चिमेकडील 'थँक्स गिव्हिंग'

जागतिक 'सुपरपॉवर' वा 'बिग ब्रदर' अशी विशेषणे लावल्या जाणाऱ्या अमेरिकेचा इतिहास केवळ तीन शतकांपूर्वीचा ! कोलंबस आणि Vespucci Amerigo यांनी १५०३ मध्ये अमेरिकेचा शोध लावला तरी १७व्या शतकात इंग्रज व डच यांनी तेथे वसाहती स्थापन केल्यानंतरच्या घडामोडी हाच आजच्या अमेरिकेच्या उदयाचा काळ. इंग्रज व डच यांचे अमेरिकेतील स्थानिकांबरोबर होणारे झगडे, युरोपमधील राजकीय-आर्थिक-सामाजिक बदलांमुळे त्या काळात तेथील भूमी सतत युद्धाच्या छायेतच होती. अमेरिकेतील अनेक वसाहतींनी आपण इंग्लंडपासून पूर्णपणे वेगळे आहोत, अशी भूमिका घेतली आणि १७८३मध्ये पॅरिसचा निर्णायक तह होऊन 'युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका' हे संयुक्त मध्यवर्ती सरकार स्थापन झाले. मग १७८८मध्ये जॉर्ज वॉशिंग्टन हे स्वतंत्र अमेरिकेचे पहिले अध्यक्ष झाले. त्यानंतर विविध देशांमधील नागरिक अमेरिकेत स्थायिक झाले. स्थलांतरितांच्या सहकार्याने अमेरिकेने अर्थ-उद्योग-विज्ञान-तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत आघाडी घेतली आणि आज अमेरिका 'सुपरपॉवर' बनली आहे. आपण ज्यांच्यामुळे घडलो त्या इंग्रज व डच नागरिकांना 'सुपरपॉवर' अमेरिकेने 'पिल्ग्रिम फादर्स' असे संबोधले आहे. अमेरिकेचे संस्थापक म्हणून त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी नोव्हेंबर महिन्याचा शेवटचा गुरुवार राखून ठेवण्यात आला आहे. या दिवसाला 'थँक्स गिव्हिंग डे' म्हटले जाते आणि हाच दिवस त्यांच्या सुगीच्या उत्सवाचाही असतो.

पृथ्वीच्या पाठीवर माणूस कुठेही गेला तरी अन्न, वस्त्र व निवारा याची सोय झाली की मगच तो पुढील कामाचा विचार करू शकतो. इंग्रज व डच नागरिकांच्या बाबतीतही असेच घडले. १६२०-२१च्या सुमारास अमेरिकेत आलेल्या इंग्रजांना स्थानिकांशी बराच लढा द्यावा लागला. त्या काळात त्यांना आपल्या देवाची प्रार्थना करायची होती म्हणून त्यांनी (बहुधा लांबची जागा शोधण्यासाठी) plymouth येथून प्रवास चालू केला व ते Massachusetts येथे पोहचले. या प्रवासाला Pilgrimage म्हटले गेले (आणि हा प्रवास करणाऱ्यांना कालांतराने 'पिल्ग्रिम फादर्स' संबोधले जाऊ लागले). तेथे पोहचल्यावर भर थंडीत त्यांनी घरे बांधली. थंडीमुळे त्यांच्यातील

काही जण मृत्युमुखी पडले, तरी त्यांच्या प्रयत्नांत खंड पडला नाही. अखेरीस स्थानिकांच्या मदतीने घरे उभी राहिली. थंडीपासून बचाव होऊन त्यांना थोडेफार अन्नधान्यही उपलब्ध झाले. मग ऋतुपालटानंतर त्यांनी गहू, ओट, बीन इत्यादी पिके घेतली. तेथील स्थानिकांनीही मका व बटाटा ही पिके घेतली. त्या काळात त्यांना खाण्यासाठी मासेही मिळाले. टर्की नावाच्या पक्ष्याचे मांसही त्यांनी भक्षण केले. अन्नधान्याची मुबलकता पाहून खूष झालेल्या या स्थानिकांनी आणि इंग्रज व डच स्थलांतरितांनी देवाचे आभार मानले व आपल्याजवळील अन्नातील थोडा वाटा त्यांनी देवांसाठी बाजूला ठेवला. हीच अमेरिकेतील Harvest Festivalची सुगीच्या उत्सवाची सुरुवात मानली जाते. अमेरिकेत स्थायिक झालेल्या पहिल्या पिढीने निसर्गाचे व देवाचे आभार मानले आणि स्थानिकांशी मैत्री केली म्हणून हा दिवस सर्वांसाठीच आनंदाचा ठरला. आजही तेथील समाजजीवनात 'थँक्स गिव्हिंग डे' महत्त्वाचा मानला जातो. घरोघरी उत्साहाचे वातावरण असते. या दिवशी टर्की पक्ष्याचे मांस, भाज्या, क्रॅनबेरी सॉस, पंपकीन पाय, स्वीट कॅन्डिड पोटॅटो आणि Succotash हे पदार्थ आवर्जून केले जातात.

अमेरिकेतील आफ्रिकी नागरिक क्वांझा हा सुगीचा उत्सव साजरा करतात. डॉ. मौलाना कारेंगा यांनी हा उत्सव चालू केला. आफ्रिकेतील कृषिसंस्कृतीशी असलेले नाते दृढ करण्यासाठी, ख्रिसमसमुळे येणाऱ्या व्यापारी संस्कृतीला प्रत्युत्तर देण्यासाठी आणि अमेरिकेतील आफ्रिकी नागरिकांना सामाजिक व राजकीय दृष्ट्या एकत्र आणण्यासाठी हा उत्सव आयोजित केला जातो.

अमेरिकेप्रमाणेच ब्रिटनमध्ये आणि कॅनडातही 'थँक्स गिव्हिंग डे' हा सुगीचा उत्सव म्हणून साजरा करण्यात येतो. जर्मनी व फ्रान्स येथेही याचे महत्त्व आहे. कॅनडात १८७९पासून ऑक्टोबर महिन्यातील दुसऱ्या सोमवारी 'थँक्स गिव्हिंग डे' साजरा करण्यात येतो. युरोपमधून तेथे आलेल्या स्थलांतरितांनी आपला उत्सव आपल्याबरोबर कॅनडात आणला. आता तो तेथे रुजला आहे. त्यामुळे युरोपमधील पद्धतींनुसार तेथे तो साजरा करण्यात येतो. मुबलक धान्य उपलब्ध झाल्यानंतर शेतकरी वर्गाकडून देवाचे/निसर्गाचे आभार मानण्यात येतात. या वेळी बकऱ्याच्या वक्राकार शिंगांमध्ये फळे व धान्य भरण्यात येते. त्याला cornucopia वा horn of plenty (विपुलतेची शिंगे) असे म्हणतात. अमेरिकेतील व कॅनडातील 'थँक्स गिव्हिंग डे' हे बऱ्याच प्रमाणात सारखेच असतात. फक्त कॅनडातील नागरिक टर्की

पक्ष्याऐवजी बकरीचे मांस खातात आणि La tourtiere नावाचा pastry pie खातात. त्यात बटाटा व सशाचे मांस असते. खरे तर 'थँक्स गिव्हिंग डे' आधी कॅनडात सुरू झाला आणि त्यानंतर तो अमेरिकेत साजरा करण्यात येऊ लागला, असेही म्हटले जाते. इंग्लंडमधील Martin Frobisher या सागरी पर्यटकाने १५७८ मध्ये कॅनडाच्या भूमीवर पाय ठेवला तेव्हा त्याने आपल्या दीर्घ प्रवास यशस्वी झाल्याबद्दल देवाचे आभार मानले व उत्सव साजरा केला. त्याच्या नावावरून Frobisher bay असे नावही तेथे पडले आहे. त्यानंतर काही स्थलांतरित कॅनडात आले. १६२१ मध्ये आणखी एक गट अमेरिकेत आला व त्यांनीही 'थँक्स गिव्हिंग डे'चे आयोजन केले.

ब्रिटनमधील चर्च या दिवसाच्या आयोजनात मोठ्या प्रमाणावर सहभागी होतात. धान्याची, विशेषत: गव्हाची गोदामे भरली आणि सफरचंदाने भरलेल्या टोपल्या बाजाराची वाट चालू लागल्या की हा दिवस साजरा होतो. या दिवशी चर्चची सजावट केली जाते, हिरव्या पानांनी आणि रंगीबिरंगी फुलांनी चर्चच्या भिंती सजतात. गव्हापासून तयार केलेला ब्रेड आणि त्याच्याभोवती फळे व भाज्या असा थाट असतो. एकप्रकारे हा चर्चमधील नैवेद्यच म्हणायचा. पुढील हंगामही असाच समृद्ध असावा, असे मागणेही या वेळी देवाकडे केले जाते. या दिवशी एक 'कॉर्न डॉली' तयार करण्यात येते. त्या चर्चमध्ये आणि शेतातही पुढच्या ऋतूपर्यंत अडकवून ठेवण्यात येतात. गव्हाची लागवड केली जाते तेव्हा 'कॉर्न स्पिरिट' गव्हात उतरते, असा समज आहे. 'कॉर्न डॉली'द्वारे हेच तत्व पुढील पिकांतही उतरावे; अशी अपेक्षा असते. या 'कॉर्न डॉली'मागे एक कथा अशी सांगितली जाते की, कोणे एके काळी जॉन बार्लीकॉर्न नामक एका चांगल्या व्यक्तीला ठार करण्याचा विडा तीन दुष्ट व्यक्ती उचलतात. पण बार्लीकॉर्न आपली क्षमता वाढवितो व त्यांना पुरून उरतो. त्याने दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ 'कॉर्न डॉली' तयार केली जाते. ब्रिटनमध्ये बाजारपेठांत व चर्चमध्ये या वेळी उत्साहाचे वातावरण असते. बाजारपेठांतील कर्मचारी वर्ग नवनवीन वेशभूषा करून मिरवणुकांत सहभागी होतो.

आयर्लंडमधील आयरिश नागरिकदेखील सुगीच्या उत्सवामध्ये सहभागी होतात. येथे एकूण तीन सुगीचे उत्सव असतात. उन्हाळ्याच्या सुरुवातीला १ व २ ऑगस्ट रोजी साजरा होणारा Lughnasadh/Lammas हा उत्सव पहिला धान्य महोत्सव असतो. या वेळी शेतकऱ्यांकडील धान्य बाजारात विक्रीसाठी येऊ लागते. जुन्या धान्याचे दिवस संपले असे या उत्सवातून सूचित केले जाते. त्या वेळी जत्रा, नृत्य-

संगीत आणि कथाकथन या उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. बटाट्यापासून तयार केलेला Poteen हा पदार्थ या वेळी विपुल प्रमाणात उपलब्ध असतो. समृद्धी आणि संपन्नता यासाठीच हा उत्सव असल्याने या पृथ्वीतलावरील आजचे आयुष्य आनंदात घालवायचे, असा या उत्सवामागील भाव असतो.

Mabon हा दुसरा सुगीचा त्सव साजरा होतो २१ व २२ सप्टेंबर रोजी. या वेळी तेथे दिवस व रात्र दोन्ही सारख्याच कालावधीचे असतात. खरे तर ऑगस्ट महिन्यात चालू झालेला सुगीचा उत्सव संपला, असे सांगण्यासाठी हा उत्सव असतो. राशींनुसार (sun signs) तूळ राशीसाठी महत्त्वाच्या असणाऱ्या पिवळा, नारिंगी आणि करडा (ब्राऊन) या रंगांना तेथे या दिवसात महत्त्व असते. यानंतर ११ नोव्हेंबर रोजी तेथे सेन्ट मार्टिन यांच्या आदराप्रीत्यर्थ साजरा करण्यात येणारा Martinamas उत्सव हा सुगीचा तिसरा उत्सव असतो. द्राक्षाचा हंगाम हे याचे निमित्त असते. सेन्ट मार्टिनच्या स्मरणार्थ या वेळी बालगोपालांसाठी घरोघरी कंदिल तयार करण्यात येतात. हे कंदिल हाती घेऊन मुले मिरवणुकीत सहभागी होतात. चिमुकल्यांची ही कंदिलयात्रा असते. फ्रान्समध्येही ११ नोव्हेंबर रोजी तेथे सेन्ट मार्टिन यांच्या आदराप्रीत्यर्थ Martinamas उत्सव साजरा करण्यात येतो व त्याचे स्वरूपही वरीलप्रमाणे असते. तथापि फ्रान्समध्ये द्राक्षाच्या हंगामाच्या वेळी २२ जानेवारी रोजी सुगीचा उत्सव असतो. वाइन तयार करणाऱ्यांचा हा सुटीचा दिवस असतो.

जर्मनीतील सुगीचा उत्सव हा प्रामुख्याने धनगरांसाठी असतो. मेंढ्यापालन करणारे मेंढपाळ डोंगराळ भागांतून परततात तेव्हा मेंढ्यांना फुलांनी सजविण्यात येते व त्यांची मिरवणूकही काढण्यात येते. राष्ट्रीय वेशभूषा केलेले नागरिक या मिरवणुकीत सहभागी होतात. तेथील शेतकरी हंगामातील पहिले धान्य पितरांना अर्पण करतात. याशिवाय द्राक्षाचा हंगाम संपल्यानंतर तेथे Oktoberfest या नावाचा एक Harvest Festival ही असतो. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या रविवारी होणाऱ्या Oktoberfestची सुरुवात महापौरांच्या हस्ते बीअरचे बॅरल उघडून केली जाते. या वेळी खाद्यपदार्थांची रेलचेल असते. जर्मनीत Erntedanktag हा सार्वजनिक सुटीचा दिवस असतो. चर्चमध्ये या उत्सवाची धामधूम असते. धान्य, फळफळावळ-फुले इत्यादी चर्चमध्ये मांडलेले असते. चिकन खाण्यासाठी कोंबड्यांना धष्टपुष्ट करण्यात येते. पश्चिमेकडील सुगीचा उत्सव असा आहे, तेथील वातावरणानुसार मांसाहार व मद्यसंस्कृतीशी जोडला गेलेला आणि पूर्वजांची व देवाची आठवण ठेवणारा !

(पृष्ठ १० वरून)

संस्कृती ही एका प्रकारे ऊर्जेसारखीच मोठी विलक्षण चीज आहे. तसे पाहिले तर ऊर्जा कधीही नष्ट होत नाही. होते ते तिचे केवळ रूपांतरण. संस्कृतीबाबतही नेमके असेच घडते. उत्क्रांतीच्या कितीही लाटा येवोत, पूर्वकालीन संस्कृतीचे काहीना काही अवशेष हे या ना त्या स्वरूपात उत्तरकालीन संस्कृतीच्या लाटांवर तरंगत राहतातच, नवसंस्कृतीच्या लाटांमध्ये गुडूप मात्र होत नाहीत. याचे मुख्य कारण हे की संस्कृती आणि उत्क्रांती यांची परस्पर वीण ही जैविक स्वरूपाची असते. अर्थात, या प्रवासात त्या अवशेषांचे मूळ स्वरूप तसेच अव्यंग राहते, असे अजिबात नाही. त्यांना नवीन साज चढतो, त्यांचे रूपांतरण होते. संस्कृतीच्या पूर्वावशेषांचा उत्क्रांतीच्या उन्नत अवस्थेतील नवीन अवतार कधी कथा-गाथा-आख्यायिकांच्या रूपात, कधी मूर्ती-चित्र-प्रतिमांच्या माध्यमातून, तर कधी सण-उत्सव-पूजोपचार-उपासनापरंपरांच्या प्रतीक रूपात पुढील नवीन पिढ्यांना सामोरा येतो. इथे मग त्या पिढ्यांसमोर आव्हान असते ते या प्रतिकांचा मुखवटा खरवडून पूर्वकालीन संस्कृतीच्या त्यांच्यापर्यंत तरंगत आलेल्या अवशिष्टांचे मूळ स्वरूप समजावून घेण्याचे आणि बदललेल्या वास्तवाच्या 'कॅनव्हास'वर त्यांचा अन्वय लावण्याचे.

दसरा-दीपावलीचा आमचा सण हा असाच एक संस्कृतिसंगम उलगडणारा सण आहे. दसरा-दिवाळीच्या या सणाचे कृषिसंस्कृतीशी असणारे घनिष्ठ नाते तसे ठसठशीतपणे दिसणारे आहे. दसऱ्याच्या सणावर विजयाचे, पराक्रमाच्या पवाड्यांचे पालाण चढलेले असले तरी मूलतः हा कृषिसंस्कृतीतील मानवी समूहांचा सुगीचा उत्सव आहे. दसऱ्यापाठोपाठ येणारी दिवाळी हाही तसाच एक सुगीचा सण. प्राचीन काळापासून दसऱ्याच्या बाह्य रूपात, तो साजरा करण्याच्या पद्धतींत अवस्थांतरे घडून येत असली तरी त्यांमुळे त्याचे मूळचे कृषिविषयक लोकोत्सवाचे स्वरूप मात्र आजवरही पार लोपलेले नाही. अगदी त्याचे वेळापत्रकदेखील शेतीच्या पीकपद्धतीच्या कालक्रमीशी निगडीत आहे. पावसाळ्यात पेरणी-लावणी केलेल्या पिकांचे भूमीने अनंत हस्तांनी भरभरून दिलेले दान घरच्या ओसरीवर येऊन ठेपले की त्या आनंदाप्रीत्यर्थ कृषिवल जो उत्सव साजरा करीत तो हा दसरा. इथे संतोष आहे तो भरघोस पिकलेल्या अन्नधान्याचा, पर्यायाने अन्नविषयक सुरक्षेचा, पोटापाण्याच्या निश्चिंतीचा आणि त्या सुपीकतेमधून निपजणाऱ्या सुबत्ता-संपन्नतेचा. नवरात्राच्या प्रथम माळेच्या दिवशी घटस्थापना करीत असताना घटाच्या स्थंडिलावर नऊ धान्यांची केली जाणारी पेरणी,

त्या धान्याचे तरारून धुमारलेले चार कोंभ दसऱ्याच्या दिवशी पागोट्यावर खोवून देवदर्शनाला जावयाचे आणि चार कोंभ देवालाही अर्पण करावयाचे, शेतात घमघमणाऱ्या तयार भाताच्या लोंब्या दसऱ्याचे तोरण म्हणून दरवाजावर टांगायच्या हा सारा कर्मोपचार दसऱ्याच्या मूळच्या शेतीसंलग्नतेकडे, सुगीचा एक आनंदसोहळा म्हणून साजऱ्या केल्या जाणाऱ्या उत्सवी स्वरूपाकडेच निर्देश करणारा आहे.

दसऱ्यानंतर येते दीपावली. हिचाही अनुबंध मुख्यतः आहे तो कृषिप्रधान संस्कृतीशीच. भटक्या, पशुपालनाद्वारे उदरनिर्वाह करणाऱ्या मानवी समूहाचे शेतीप्रधान समाजात रूपांतर होणे हे एक मोठेच स्थित्यंतर होते. शेतीप्रधान समाजव्यवस्था आणि जीवनपद्धती स्थिरावण्याची प्रक्रियादेखील प्रदीर्घ काळ साकारतच होती. त्यानंतर अशा कृषिसंलग्न सण-उत्सवांची परंपरा समाजात रुजावी, हे ओघानेच येते. याचाच अर्थ हा की, दसरा-दिवाळीसारखे मूळचे कृषिसंलग्न सण हे कृषिसंस्कृती चांगल्यापैकी स्थिरावल्यानंतर निपजलेले आहेत. ऊर्जेच्या नियमाप्रमाणेच उत्क्रांतीच्या या टप्प्यावर पोहोचलेल्या मानव समूहाच्या चालीरीतींत, सण-उत्सवांच्या परंपरात उत्क्रांतीच्या त्या विशिष्ट टप्प्याआधीच्या टप्प्यातील मानवी जीवनाचे काही अवशेष हे दृग्गोचर व्हावयास हवेतच. दिवाळीच्या सणाचे आजचे स्वरूप अंमळ सखोलपणे न्याहाळले तर संस्कृतीच्या प्रदीर्घ प्रवासाचे हे उभय टप्पे - पशुपालन आणि शेतीप्रधान जीवन - वसुबारसेपासून ते यमद्वितीयेपर्यंत (भाऊबीज) साजऱ्या होणाऱ्या दीपावलीच्या सहा दिवसांच्या लोकाचारात, विधी-संकेतांत आपल्याला स्पष्टपणे आढळतात. अगदी काटेकोरपणे बोलावयाचे तर, तांत्रिकदृष्टया गोवत्सद्वादशी (वसुबारस) आणि यमद्वितीया (भाऊबीज) यांचा समावेश दिवाळीमध्ये होत नाही, परंतु आपल्याकडील परंपरेमध्ये आपण त्यांचा समावेश दीपावलीतच करीत असल्याने आपण त्यांचा इथे एकत्रच विचार करू.

## स्मरण आणि दर्शन संस्कृतिसंगमाचे

शेतीप्रधान स्थिर जीवनपद्धती अंगवळणी पडण्यापूर्वी पशुपालक अवस्थेतील मानवी समाजात गाई-बैल-घोडे-मेंढ्यांसारखी जनावरे हीच तत्कालीन समाजाची मुख्य संपत्ती होती. आजच्या, आमच्या अगदी संगणकयुगातदेखील गाईगुरांनी गजबजलेला गोठा हे लक्ष्मीचेच प्रतीक गणले जाते. ग्रामीण भागातील समाजव्यवस्थेत आणि तेथील सत्तासोपानाच्या उतरंडपूर्ण रचनेत ज्याचे त्याचे स्थान ज्याच्या त्याच्या दावणीच्या समृद्धीवरच ठरते. दावणीची समृद्धी याचा सोपा अर्थ म्हणजे दावणीला असलेली

गुरांची संख्या. गोठ्यातील जनावरांच्या संख्येला उतरती कळा लागणे हे आर्थिक स्थिती खालावल्याचे स्पष्ट चित्र आजही मानले जाते. एखाद्याची दावण उजाड झाली म्हणजे त्याची सांपत्तिक वाताहत झाली, असा वाक्प्रचारही व्यवहारात वापरला जातो. पशुसंख्येशी संलग्न असलेल्या या साऱ्या संपत्तीविषयक धारणा म्हणजे एका अर्थाने प्राचीन पशुपालक समाजाच्या धारणा-संकेतांचे अवशेषच. अगदी यज्ञप्रधान संस्कृतीतही भरपूर गाईगुरे लाभावीत, गाईबैलांच्या कळपांना, खिल्लारांना रोगराईची बाधा होऊ नये, शत्रूने खिल्लारे हिरावून नेऊ नयेत यासाठी यज्ञीय देवतेकडे प्रार्थना करण्याचे कित्येक मंत्र वैदिक वाङ्मयाच्या संभारात आढळतात.

इंद्र ही तर वैदिक आर्यांची सर्वशक्तिमान देवता. गाईबैलांचे कळप उत्तरोत्तर वाढत जावोत, खिल्लारे धष्टपुष्ट राहण्यासाठी भरपूर वृष्टी करण्याची कृपा इंद्र करो या प्रकारच्या याचना इंद्रस्तुती करणाऱ्या साहित्यात विपुल सापडतात. कृषिसंस्कृती चांगल्यापैकी स्थिरावलेल्या आर्यांची जीवनप्रणाली यज्ञप्रधान होती, हे इथे ध्यानात घ्यावयास हवे. तरीदेखील, पशुपालनाबाबतची आस्था तत्कालीन जीवनाच्या विविधांगांतून व्यक्त होते ती दोन कारणांनी. एक तर पशुधन आणि शेतीच्या व्यवसायाचा असणारा अन्योन्य संबंध, आणि दोन म्हणजे कृषिसंस्कृतीचा तिच्या पूर्वकालीन अवताराशी म्हणजे पशुपालन संस्कृतीशी असणारा आत्मिक संबंध. या संबंधांचे स्मरण अश्विन वद्य द्वादशीस दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या गोवत्सद्वादशीच्या सणाच्या दिवशी -म्हणजेच वसुबारसेच्या दिवशी - आम्ही आजही करतो. धनत्रयोदशीचा हा आधला दिवस. या दिवशी पूजा होते ती सवत्स धेनूची. धनत्रयोदशी हा दिवाळीचा,म्हणजेच कृषिप्रधान संस्कृतीच्या मुख्य सणाचा प्रारंभ गणला तर त्याच्या आधी मानवी संस्कृतीच्या कृषिप्रधान अवस्थेआधीच्या युगाचे -पशुपालनप्रधान युगाचे- स्मरण घडविणाऱ्या वसुबारसेच्या सणाचे औचित्य अधिक विवरून सांगण्याची गरज पडत नाही.

शेतीमध्ये सोन्यासारख्या पिकलेल्या अन्नधान्याच्या सोनपावलांनी येणाऱ्या दीपावलीच्या सणातील लक्ष्मीपूजन आणि मुख्य म्हणजे बलिप्रतिपदा या दोन दिवशीही पशुपालनप्रधान आणि कृषिप्रधान संस्कृतींच्या संगमाचे स्मरण आपल्याला त्या त्या दिवशीच्या विधी-व्रताचारांद्वारे होतेच. दीपावली हा स्वरूपतःच कृषिसंस्कृतीशी संलग्न असा सण. शेतीच्या सुफलतेमधून निपजणाऱ्या संपन्नतेचे स्वागत करणारा आणि त्या संपन्नतेस कारणभूत ठरणाऱ्या इंद्र, कुबेर, लक्ष्मी आणि मुख्य म्हणजे बळीराजाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा, त्या कृतज्ञतेपोटी त्यांची आदराने पूजा करणारा उत्सव.

शेतात नव्यानेच उदंड पिकलेल्या अन्नधान्याच्या रूपाने घरी आलेल्या लक्ष्मीचे स्वागत करण्यासाठीच तर धनत्रयोदशीस घरदार स्वच्छ करून, घरातील सोने-नाणे-अलंकार घासूनपुसून लक्ष्मी-विष्णू, कुबेरासह घरातील द्रव्यनिधीची पूजा करावयाची. इथे दोन भावनांचा संगम दिसतो. एकतर शेतीतील सुबत्तेपायी घरी आलेल्या उदंड धान्यधुन्याने 'फूड सिक्युरिटी'बाबत आश्वस्त केलेले असते. दुसरे म्हणजे, हे ज्या देवदेवतांच्या कृपाप्रसादाने घडले त्यांच्याप्रती आदराची भावना व्यक्त करीत असतानाच त्यांची अशी कृपा उदंड राहो, अशी मागणीही नोंदवावयाची असते.

अश्विन अमावास्येच्या दिवशी केल्या जाणाऱ्या लक्ष्मीपूजनातही हाच भाव केंद्रस्थानी असतो. या दिवशीच्या पूजनात साळीच्या लाह्यांचे असणारे माहात्म्य विलक्षण बोलके आहे. पूजासाहित्यात शेतीच्या पीकपद्धतीचेही प्रतिबिंब पडावे, हे अतिशयच स्वाभाविकच ठरते. कारण, भात हे खरीपातील मुख्य पीक. त्यातही ते भारतातील अति प्राचीन पिकांपैकी एक. अगदी आर्यपूर्वकालीन समाजसमूहांनाही तांदूळ या पिकाची माहिती होती. यातही, पशुधनालाच लक्ष्मी मानणाऱ्या पूर्वकालीन संस्कृतीचे अवशेष कसे दृष्टोत्पत्तीस पडतात पहा. राजस्थानात अश्विन अमावास्येच्या दिवशी बैलांची पूजा केली जाते. आपल्याकडे श्रावण वा भाद्रपद महिन्यातील अमावास्येला जसा बैलपोळा साजरा केला जातो, तसाच हा राजस्थानातील एक सण.

लक्ष्मीपूजनानंतर येणाऱ्या कार्तिक शुद्ध प्रतिपदेस 'बलिप्रतिपदा असे आपण म्हणतो. हा तर दीपावलीचा मुख्य दिवस. विक्रम संवताचा वर्षारंभ. बळीराजा आणि शेती यांच्या अन्योन्य संबंधांबाबत अधिक विविरण करण्याचीही गरज नाही. 'इडापिडा टळो आणि बळीचे राज्य येवो' ही म्हणच अतिशय अन्वर्थक आहे. या दिवशी केले जाणारे बलीचे आदरपूर्वक पूजन, त्याच्याच जोडीने केली जाणारी गोवर्धनाची वा अन्नकूटाची पूजा आणि घरातील गाईगुरांना सजवून, त्यांची पूजा करून नंतर काढली जाणारी त्यांची मिरवणूक हे सारे विधी व उपचार पशुपालनप्रधान संस्कृती आणि शेतीप्रधान संस्कृती यांच्या मीलनाचे संस्मरण घडविणारे आहे. गोमयापासून या दिवशी तयार केला जाणारा गोवर्धन पर्वत, त्यावर खोवलेल्या दुर्वा व फुले, इंद्र, कृष्ण, कृष्णाचे गोपसंवगडी, गोकुळातील गाईवासरे, खिल्लारे यांच्या प्रतिकांच्या पूजा हे सारे या संस्कृतिसमन्वयाच्या संदर्भात अर्थबोधक आहे. इंद्रपूजक, कृषिप्रधानतेकडे हळूहळू वळू लागलेला समाज आणि पशुपालनावरच निर्भर असलेला समाज यांच्यादरम्यान संस्कृतींच्या संधिकाळात उद्‌भवलेल्या संघर्षाचे उत्तरकाळात क्रमाने झालेले निरसन

बलिप्रतिपदेच्या दिवशी इंद्र आणि कृष्ण या एका अर्थाने दोन विभिन्न संस्कृतिपरंपरांच्या प्रतिनिधींच्या एकत्र पूजनाद्वारे इथे सूचित होते. अन्नकूट हे गोवर्धनाचेच एक नाव. कृष्णाच्या प्रतिमेसमोर खाद्यान्नांची रास रचून पूजा करावयाची हा विधीही अन्नधान्याबाबतच्या सुरक्षेमधून परावर्तित होणाऱ्या आनंदाच्या राशींचाच द्योतक. या दिवशी केली जाणारी गोधनाची पूजा, सजवणूक, मिरवणूक ही तशी सार्वत्रिक आहे. अगदी उत्तर प्रदेशच्या डोंगराळ भागातील रहिवाशांपासून ते थेट नेपाळातील शेतीप्रधान समाजही या दिवशी गाईबैलांची पूजा करतातच.

दीपावलीसारख्या सणांच्या निमित्ताने केल्या जाणाऱ्या देवतापूजनातही संस्कृतीच्या उत्क्रांतीमधील विविध टप्प्यांवर तत्कालीन समाजसमूहांना अन्नधान्याच्या सुरक्षेबाबत आश्वस्त बनविण्यात दैवतमंडलातील विविध देवदेवतांनी त्या त्या मानवसमूहांच्या भाव तसेच श्रद्धाविश्वात बजाविलेल्या भूमिकेचे सूचन होते. भारतीय दैवतसमूहातील इंद्र या केवळ एकाच देवतेचे उदाहरण या ठिकाणी आणि या संदर्भात पाहण्यासारखे आहे. इंद्र ही वैदिक आर्यांची एक सर्वश्रेष्ठ आणि पराक्रमी देवता गणली जाते. ऋग्वेदात असलेल्या एकंदर सूत्रांपैकी तब्बल एक चतुर्थांश सूत्रे ही एकट्या इंद्राच्या संदर्भातील आहेत, एवढी एकच बाब पुरेशी बोलकी ठरेल. पुराणकथांमधून आपल्यासमोर चितारले जाणारे इंद्राचे व्यक्तिचित्र हे विलासी, भोगप्रधान, ऐन्द्रीय सुखलोलूप, त्या सुखप्राप्तीसाठी नीती-अनीतीचा फारसा विधिनिषेध न बाळगणारा, सदैव आपल्या आसनाच्या स्थैर्याबाबतच्या आशंकेने वेढलेला आणि धास्तावलेला असा देवांचा राजा, या पठडीतील असते वा आहे. परंतु, कृषिसंस्कृतीला सरावलेल्या आणि यज्ञप्रधान आचारविधीला अग्रक्रम बहाल करणाऱ्या वेदकालीन आर्यांना मात्र इंद्रामध्ये दर्शन घडत होते ते अन्नधान्यविषयक सुरक्षेची हमी त्यांना देणाऱ्या, पाहिजे तेवढा पाऊस पाहिजे तेव्हा पाडण्याचे आश्वासन देणाऱ्या, गायींच्या संख्येत वाढ घडवून आणण्याचे वरदान देणाऱ्या पाठीराख्याचे.

निरुक्तामध्ये यास्काने 'इंद्र' या शब्दाची जी बहुपदरी व्युत्पत्ती दिलेली आहे, ती इंद्राबाबतच्या तत्कालीन मानवसमूहांच्या धारणांबाबत प्रबोधन घडविणारी अशीच आहे. 'जो अन्न देतो तो इंद्र', 'जो अन्न धारण करतो तो इंद्र', अशी 'इंद्र' या संज्ञेची व्याख्या यास्काने केली आहे. अन्नधान्याबाबतच्या सुरक्षेची निकड आणि ती पुरविणाऱ्याप्रती तत्कालीन मानवसमूहाची असणारी पराकोटीची तीव्र पूज्यबुद्धी यांचे यथार्थ दर्शन यातून घडते. इंद्राच्या ठायी शेतीबाबतचे काही मूलभूत ज्ञान असावे, अशीही तेव्हाच्या

मानवजातीची कल्पना असावी, असेही मानण्यास जागा आहे. कारण, 'जो बी फोडून धान्य बाहेर काढतो तो इंद्र', 'जो पृथ्वीला भेगा पाडतो तो इंद्र' अशाही 'इंद्र' या पदाच्या व्युत्पत्या यास्काने दिलेल्या आहेत. सर्व भूतमात्रांची उत्पत्ती, स्थिती आणि लय अन्नातच ठरलेला आहे, अन्न हेच मनुष्याचे प्राण आहेत, अशा ज्या मानवसमूहांच्या अन्नविषयक धारणा ज्या काळात आणि मानवी उत्क्रांतीच्या ज्या टप्प्यावर होत्या त्या टप्प्यावर त्याच अन्नपुरवठ्याची हमी देणाऱ्या कृषिकर्माचे प्राथमिक ज्ञान असणारे तत्व हे पूजनीय गणले जावे यात अस्वाभाविक असे काहीच मग उरत नाही. शेतीप्रधान समाजाला कृषितंत्राचे केवळ ज्ञानच असून भागत नाही. विज्ञानाचा मागमूसही नसलेल्या काळात जी शेती पूर्णतः निसर्गशरण असते त्या शेतीच्या फुलण्या-बहरण्यास निसर्गाच्या अनुकूलतेच्या वरदहस्ताचीही निकड असतेच. हा वरदहस्त ज्या तत्वाच्या वा तत्वांच्या हस्तक्षेपावर अवलंबून असतो त्यांना त्या त्या मानवसमूहांच्या श्रद्धाविश्वात देवत्व प्राप्त व्हावे, हेही ओघानेच येते. कृषिप्रधान संस्कृतीच्या टप्प्यावर पोहोचलेल्या मानवसमूहाला इंद्राचा वरदहस्त महत्त्वाचाच केवळ नव्हे तर जीवनमरणाचाही वाटत होता, कारण शेतीमध्ये सोने पिकण्यासाठी आवश्यक असणारी पुरेशी पर्जन्यवृष्टीही अखेर इंद्राच्याच मुष्टीत आहे, अशी तत्कालीन समाजाची धारणा होती.

'वज्र' हे जे इंद्राचे आयुध आहे, त्याचा महिमा इथे दडलेला आहे. पर्जन्यवृष्टीचे माध्यम म्हणजे आकाशात दिसणारे ढग, हे वेदकालीन मानवसमाजाला निरीक्षणांती ज्ञात झालेले वास्तव होते. मात्र, त्या ढगांमधून कधीतरी अवचितच पाऊस बाहेर कसा येतो, पाण्याने पखालीसारखे गच्च भरलेले ढग अनेकदा वृष्टी न करताच पुढे निघून का व कसे जातात, याचे कोडे मात्र त्याला उलगडत नव्हते. अखेर, त्या श्रद्धाशील इंद्रपूजक मनाने असा तर्क बांधला की, आपल्या हातातील वज्राचा प्रहार करूनच हा महापराक्रमी इंद्र ढगांनी कोंडलेल्या जलनिधीला पृथ्वीवर झेपावण्याचा मार्ग मोकळा करून देत असला पाहिजे. इंद्राची स्तुती करावयाची ती त्याने आपल्या वज्रप्रहाराने ढग विदीर्ण करून वर्षाधारा मुक्त कराव्यात यासाठीच. कारण, पाऊसच पडला नाही, तर पिकणार काय, आणि पुरेसे पिकलेच नाही तर खाणार काय ? इंद्र केवळ ढगांमध्ये अडकलेला पाऊसच मुक्त करतो असे नाही तर, भूमीवर पडलेला परंतु पर्वतांनी रोखून धरलेला जलप्रपातरूपी पाऊसही तो पर्वत फोडून मुक्त करतो, अशीही वेदकालीन मानवाची धारणा. इंद्र पूज्य यासाठी. दीपावलीमध्ये त्याचे स्मरण म्हणूनच. कारण अंतिम महत्त्वाची ठरते ती 'फूड सिक्युरिटी'च ! ✿✿

# यातुविद्या आणि जमिनीचे सुफलन

ढगातून पाऊस नेमका पडतो तरी कसा, याचा उलगडा न होणाऱ्या प्राचीन काळातील मानवसमूहाला त्याच्याच जोडीने आणखी एक कोडे सर्व जगभरच पडत होते. जमिनीच्या पोटात गडप झालेल्या बीजाला अंकूर फुटतो तरी कसा, हे ते दुसरे कोडे. या दोन्ही रहस्यांचा भेद होणे त्याच्या लेखी अतिशय महत्त्वाचे होते कारण त्याचे अस्तित्वच मुळात या दोन बाबींवर पूर्णपणे अवलंबून होते. प्रागैतिहासिक काळातील त्या मनुष्यमात्राने आपली बुद्धी चालवून असा निष्कर्ष काढला की या संपूर्ण विश्वात वास करणारी अशी काही तरी एक दिव्य शक्ती आहे की जी या जगाचे नियंत्रण करते. ढगांतून पाऊस तीच पाडते, जमिनीचे पोट फाडून अंकूर तीच वर आणते....वगैरे...वगैरे.... त्या शक्तीला त्याने नाव दिले - यातू अथवा यातुशक्ती ! मात्र केवळ एवढेच करून तो थांबला नाही, तर, आपले भौतिक जीवन सुखकर व्हावे यासाठी जगराहाटीवर सत्ता चालविणाऱ्या या यातुशक्तीला प्रथम आपल्या अंकित आणि नंतर वश करून घेण्याच्याही उद्योगाला तो लगोलग लागला. त्यासाठी त्याने ज्या क्रिया शोधून काढल्या त्यांना नाव पडले यातुक्रिया. या यातुक्रिया वापरण्याची जी विद्या तिचे अभिधान यातुविद्या. जमीन भरघोस पिकावी, त्यासाठी पाऊस वेळेवर आणि भरपूर प्रमाणात पडावा यासाठी त्याने नाना प्रकारच्या यात्वात्मक क्रिया निर्माण केल्या. एका बीजामधून फुटलेल्या अंकुराला कालांतराने चांगले रसरशीत कणीस येते कारण पृथ्वीच्या ठायी

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

सुफलनाच्या काहीतरी क्षमता दडलेल्या आहेत, असाही तर्क प्राचीन काळातील मानवाने बांधला. आता प्रश्न आला की या सुफलन क्षमतांचे रक्षण-वर्धन कोण करते, हा. त्याला उत्तर होते यातुशक्ती. तिला प्रसन्न करणारे मंत्रतंत्र सोपस्कार यथास्थित केले की ती उदार अंतःकरणाने जमिनीच्या ठायी असणाऱ्या सुफलन क्षमतांचे रक्षण करील आणि मग आपल्याला अन्नधान्याची ददात कधीच पडणार नाही, हाही विचार प्रागैतिहासिक माणसाने केला.

हे झाले यातुशक्ती-यातुक्रिया-यातुविद्याविषयक भारतीय विचारव्यूहाचे संक्षिप्त विवरण. थोड्याफार फरकाने हेच तर्कशास्त्र वेगवगळ्या काळात जगाच्या विविध भागांत आपला अंमल गाजवून गेलेले आहे. इस्लामच्या छायेत जाण्यापूर्वी इजिप्तमध्ये जो सुगीचा वसंतोत्सव साजरा होत असे, त्यामागील धारणा या नेमक्या याच होत्या. एक तर मध्य आशियाच्या जणू पाचवीलाच पुजलेली पाण्याची टंचाई. त्यामुळे हातातोंडाशी आलेली पिके हातोहात जाण्याचा धोका नित्याचाच. हवामानही चमत्कारिकच. नाईलला दरवर्षी येणाऱ्या पुरांमुळे इजिप्तच्या वाट्याला आलेली सुपीकता आणि सुबत्ता ही पूर्णतः निसर्गाधीन. त्यामुळे, पीक चांगले पिकून अन्नधान्य घरी आल्यानंतर, जमिनीची सुफलता टिकवून ठेवणाऱ्या देवतेचे आभार मानण्यासाठी आणि त्याचबरोबर जमिनीची सुपीकता-सुफलता अशीच टिकवून ठेव, अशी प्रार्थनाही करण्यासाठी १५०० वर्षांपूर्वीच्या इजिप्तमध्ये सुगीच्या उत्सवात एक भव्य शोभायात्रा काढली जावयाची.

या यात्रेचे नेतृत्त्व साहजिकच राजा-राणीकडे. या गोलाकार शोभायात्रेदरम्यान राजाराणीने उभयतांनी देवतेप्रीत्यर्थ काही विशिष्ट मंत्र एकूण सात वेळा म्हणावयाचे. राजाने मंत्रोच्चारण करण्याचे माहात्म्य एवढ्याचसाठी की लोकधारणेनुसार उपास्य देवतेशी राजाचा थेट संबंध असतो तरी अथवा तो प्रस्थापित करण्याची शक्ती तरी राजाच्या ठायी असतेच असते. आमचे भरणपोषण करणाऱ्या जमिनीची सुफलन क्षमता भविष्यातही अशीच कायम राहो, हा या प्रार्थनेचा आशय. जमिनीच्या सुफलन क्षमतांचे रक्षण करणारी देवता या प्रार्थनेमुळे प्रसन्न व्हावी, हा त्यामागील उद्देश. तिच्या प्रसन्न होण्याने जमिनीची सुफलन शक्ती सातत्यशील राहावी, यंदाचे पीक चांगले दिल्याने तिच्या ठायीच्या सुफलन क्षमतांची काही प्रमाणात घट झालेली असेल तर त्या क्षमतांचे जोमाने पुनरुज्जीवन व्हावे, हे ईप्सित....अन्नधान्यविषयक सुरक्षा हाच पृथ्वीच्या पाठीवर कोठेही वास करणाऱ्या माणसाच्या चिरंतन चिंतनाचा विषय कसा होता, याचाच हा एक पुरावा !

## प्रमुख संदर्भ

(1) www.harvestfestival.net (2) www.longman.co.uk
(3) http://en.wikipedia.org (4) www.everythingesl.net/lessons/harvest (5) www.goafricaabout.com (6) www.pongalfestival.org
(7) www.mnsu.edu/emuseum/cultural (8) www.chinapage.com
(9) www.iexplore.com (10) www.vohuman.org
(11) www.unesco.org (12) www.only4ukids.com
(13) www.ranchochamber.org (14) www.partyguideonline.com
(15) www.2camels.com (16) www.jewfaq.org
(17) www.marimari.com (18) www.worldeventsguide.com
(19) www.diggers.com.au (20) www.essortment.com

(१)सुलभ विश्वकोश (भाग पहिला) संपादक - य.रा. दाते व चिं.ग. कर्वे, प्रसाद प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, १९४९, पृष्ठ क्रमांक ११५ ते ११९.

(२) महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश, विभाग पहिला, संपादक :- य. रा. दाते, चिं. ग. कर्वे, महाराष्ट्र कोशमंडळ लिमिटेड, पुणे, १९४७, पृष्ठ क्रमांक - ४२ ते ४५.

(३) भारतीय संस्कृतिकोश, संपादक -पं. महादेवशास्त्री जोशी, सहसंपादक - तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर, व. ग. सहस्त्रबुद्धे, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, द्वितीयावृत्ती, १९८२, पृष्ठ क्रमांक : खंड १- १७२ ते १७५, खंड २ - ४६९ ते ४७४, खंड ३- १८४-१८५, खंड ४- ३८८ ते ३९३, खंड ५- ४६७ ते ४७०, खंड ७- ५९९ ते ६२०.



### ‘अर्थबोधपत्रिके’च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. ‘अर्थबोधपत्रिके’च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनाचर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**'मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रु पये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१ जून २००६ पासून)

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** : फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

## ग्रंथालयातील नवी पुस्तके

(1) Is War Necessary for Economic Growth ? - Military Procurement and Technology Development, Rutton Vernon W., O.U.P. Oxford, 2006, Price Rs.1944( $ 45)

(2) Between the Empires : Society in India 300BCE to 400CE, Olivelle Patrick (Ed.), O.U.P., New York, 2006, price Rs.695/-

(3) Conversations on Russia - Reform from Yeltsin to Putin, Desai Putin, O.U.P., New Delhi, 2007, Price Rs. 595/-

(4)International Competitiveness and Knowledge-based Industries in India, Kumar Nagesh, K.J. Joseph (Ed.), O.U.P., New Delhi, 2007, Price Rs. 675/-

(5) Regulation, Markets and Poverty, Cook Paul and Sarah Mosedate, O.U.P., Price Rs. 4724/- (55 Pounds)

(6) Ecomomic Development and Environmental Sustainability New Policy Options, Lopez Ramon and Michael A. Toman, O.U.P., Oxford 2006, Price Rs. 1718 (20 Pounds)

(7) Elections, Parties, Democracy - Conferring the Median Mandate, McDonald Michael D. and Ian Budge, O.U.P., Oxford, 2005, Rs. 4037/- (47 Pounds)

(8)History of Science, Philosophy And Culture in Indian Civilization, Vol X Part 6 - Aspects of India's International Relations 1700 to 2000: South Asia and the World, Ray Jayanta Kumar, (Ed.), Gen. Ed., D.P. Chattopadhyaya, Pearson/Longman, New Delhi, Centre for Studies in Civilizations, New Delhi, 2007, Price Rs. 2000/-

(9) The Chinese Economy - Transitions and Growth, Naughton Barry, The MIT Press, Cambridge, 2007, Price Rs. 1037/- ($ 24)

(10) Determinants of Pro-Poor Growth - Analytical Issues and Findings from Country Cases, Grimm Michael, Stephan Klasen and Andrew McKey, Palgrave/Macmillan, New York, 2007, Price 5154/-(60 Pounds)

(11) From Competition at Home to Competing Abroad - A Case Study of India's Horticulture, Matto Aaditya, Deepak Mishra, Ashish Narain, O.U.P., New Delhi, World Bank, Washington, 2007, Price Rs.495/- ■■

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
Licensed to Post Without Prepayment, LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका योग्य नमुन्यात प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •अभय टिळक •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी
•सुहास पळशीकर •रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**